सहकार भारतीचे
मुखपत्र

बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार

# सहकार सुगंध

ISBN
978-81-940842-0-4

PRGI NO. MAHMUL/2005/16099

• पुणे • वर्ष : २१ • अंक ६ • सप्टेंबर २०२५ • पृष्ठे ४० • किंमत : रु. ३०/- • संपादक : भालचंद्र कुलकर्णी




## सहकार भारतीच्या विणकर सेलच्या पहिल्या राष्ट्रीय अधिवेशनाचे उद्‌घाटन




## 'विस्मा'च्या वतीने राज्यस्तरीय साखर परिषदेचे पुण्यात आयोजन




## साखर कारखाने कृषी प्रक्रिया केंद्रे व्हावीत - सतीश मराठे



दि धरमपेठ महिला
मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर. (महाराष्ट्र, छत्तिसगढ व मध्यप्रदेश)
आपला परिवार, आपली संस्था !
31 वर्ष
सीताराम भवन
ऑडिटोरियम आणि गेस्ट हाऊस
बुकींग सुरु
7888002023
वाढदिवस | मुंज | साक्षगंध | सांस्कृतिक कार्यक्रम | कॉन्फरन्स
BANKING P.O
90 DAYS TRAINING
BANKING POINT PROGRAMME P.O.
A Bridge of Banking Career
Join The Dharampeth Mahila Society Probationary Officer Programme P.O.
Enroll Now & Grab The Opportunity
8055026129
100% Placement Guarantee*
तुमचे सोने करेल,
तुमचे स्वप्न साकार!
• सुलभ प्रक्रिया
• जलद कर्ज वाटप
• किमान दस्तऐवज
अधिक माहितीकरीता संपर्क
9822272947
9665936970
अक्षय तृतिया
गोल्ड लोन
0.75%
व्याजदर प्रती माह
सर्व आर्थिक समाधानांसाठी एकच संस्था
तुमच्या सेवेत सदैव तत्पर
LOCKERS सुविधा
SMS अर्लट
DEPOSIT सुविधा
NEFT, RTGS सुविधा उपलब्ध
MOBILE बँकिंग
₹ 2350 कोटींच्या वर व्यवसाय
GOLD LOAN उपलब्ध
CORE बँकिंग
LIC पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
MSEDCL विज बिल भरणा केंद्र
LOAN सेवा सुविधा
GIC पॉलिसी काढण्याची व नुतनीकरणाची सुविधा
मुख्य कार्यालय : प्लॉट नं 42-अ सीताराम भवन, हनुमान मंदीर समोर, रामनगर चौक, शिवाजीनगर, नागपूर-440010.
फोन : 0712-2220716, 2524337, 2520303


आधारवड
कार्यक्षेत्र : महाराष्ट्र,मध्यप्रदेश
राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी म.बुलडाणा
राजर्षी शाहू
र.नं. ८१९
ISO ९००१:२०१५ मान्यता प्राप्त संस्था
बँको पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून FCBA पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून मल्टीस्टेट फेडरेशनचा सहकार गौरव पुरस्कार प्राप्त संस्था
रा.ल. उपाख्य भाऊसाहेब शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
घटस्थापना
निमित्त सर्व भाविक भक्तांना तसेच
सर्व सभासद बंधू भगिनींना
हार्दिक शुभेच्छा..!
तसेच ईद-ए-मिलाद निमित्त सर्व मुस्लिम बांधवांना हार्दिक शुभेच्छा..!
संदीप शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू मल्टीस्टेट
अध्यक्ष राजर्षी शाहू परिवार
राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी म.बुलडाणा
तुमच्या सेवेत सदैव तत्पर..!
संस्थेची वैशिष्ट्ये
१. एकूण ६१ शाखेचा विस्तार
२. १००० कोटींचा व्यवसाय
३. १,५०,००० सभासद संख्या
४. 'शाहू पे हे पेमेंट ॲप विकसित करणारी भारतातील पहिली पतसंस्था
५. महिला बचत गटाच्या माध्यमातून ६० हजार महिलांना २४३ कोटी रुपयाचे कर्ज वाटप.
६. 75 कोटी रु. सोने तारण कर्ज वाटप.
LOCKERS सुविधा
NEFT,RTGS सुविधा उपलब्ध
SMS अलर्ट
MOBILE बँकिंग
अनेक प्रकारच्या पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
DOORSTEP बँकिंग
GOLD LOAN उपलब्ध
MSEDCL वीज बिल भरणा केंद्र
CORE बँकिंग
DEPOSITE सुविधा
NET बँकिंग
LOAN सेवा सुविधा
SHAHU PAY
सौ. मालती संदीप शेळके
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसा. बुलडाणा
www.rajarshishahumultistate.com
+९१-९३५९९४१८५३


netwin
Ideas to Life
आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) सह स्मार्ट बँकिंगचा नवा अनुभव!
शासकीय नियमावलीवर आधारित अत्याधुनिक कोअर बँकिंग सोल्यूशन
NPA व्यवस्थापन आणि सुबक रिपोर्ट्सची सुविधा
सुलभ कर्ज अर्ज – सुरक्षित, सोपी आणि जलद डिजिटल प्रक्रिया!
संस्थेच्या वाढीसाठी NetPay UPI QR कोड सुविधा
Certification
ISO
ISO
CMMI
netwin
SCAN & PAY
BHIM UPI
netwin
Ideas to Life
नाविन्य, विश्वास आणि गुणवत्तेचं प्रतीक.
AI-सक्षम प्रणालीद्वारे आधुनिक आणि गतिमान बँकिंग सेवा
तुमचा चेहरा तुमची ओळख – खाते उघडण्यासाठी फक्त एक सेल्फी पुरेशी!
आधार OTP आणि डिजिटल ई-केवायसी द्वारे खाते सुरू करा
बायोमेट्रिक वर आधारित अचूक प्रमाणीकरण
स्मार्ट डॅशबोर्ड्स आणि रिअल टाईम डेटा नियंत्रणाची सुविधा
संपूर्णतः पेपरलेस, जलद आणि सुरक्षित व्यवहार अनुभव
आजच आपल्या संस्थेला बनवा AI-सक्षम!
०२५३ ६६५ १५००
अधिक माहितीसाठी स्कॅन करा
sales@netwinindia.in
www.netwin.in


50+ YEARS OF MOMENTUM
अर्थ सहकारेण कल्याणम्
दि कल्याण जनता सहकारी बँक लि.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
BE A PART OF THE EVOLUTION
RoI :
Personal Use
8.50%* p.a
Commercial Use
10.50%* p.a
Loan Amt.
90% of Invoice Amount*
Electrical Vehicle Loan
TOLL FREE: 1800 233 1919
kalyanjanata.in
KJSBank




स्वत:च्या कुटुंबासाठी हवे

**स्वत:चे घर,**

ठेवा विश्वास जनसेवेच्या

**'घरकुल' कर्जावर !**

# जनसेवा घरकुल कर्ज

रो हाऊस, बंगला, फ्लॅट
खरेदीसाठी किफायतशीर कर्ज उपलब्ध.
(सिबिल स्कोरनुसार व्याजदर)

* अटी लागू

- आकर्षक व्याजदर
- तत्पर सेवा
- अल्प प्रोसेसिंग फी
- रु. 2 कोटींपर्यंत कर्ज

**संपर्क क्र. - 84 85 87 12 52**

## जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.

जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !

**मुख्य कार्यालय** : प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.

www.janasevabankpune.net

|| बिना संस्कार नहीं सहकार । बिना सहकार नहीं उद्धार ||

सहकार सुगंध

ISBN : 978-81-940842-0-4

# अनुक्रम


* सहकार भारतीच्या विणकर सेलच्या पहिल्या राष्ट्रीय अधिवेशनाचे उद्घाटन ..............९
* सहकारी बँकासाठी आधार प्रमाणीकरण चौकटीची निर्मिती ..............................१०
* सहकारी पतसंस्थांच्या आयकर प्रश्नाबाबत अर्थमंत्र्यांसमवेत बैठक घेणार : केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचे सूतोवाच ..............................................११
* रसाखर कारखाने कृषी प्रक्रिया केंद्रे व्हावीत – सतीश मराठे यांची अपेक्षा .............१२
* साखर उद्योगात उपपदार्थ निर्मितीसाठी एआय वर भर हवा – सहकारमंत्री पाटील ......१३
* बँकींग क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता : काळाची गरज ........................................१४
* सॅफमधून सुटका, आता पी.सी.ए.चा झटका...........................................१५
* सोलापूर जिल्हा सहकार भारती आयोजित प्रशिक्षण वर्ग यशस्वी.........................१६
* सांगली जिल्हा सहकार भारती आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धा.....................१७
* सांगली अर्बन बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांना ७ टक्के लाभांश जाहीर ..१८
* शिक्षक सहकारी बँकेला ९.१७ कोटींचा निव्वळ नफा, नेट एनपीए शून्य टक्के...........१९
* गोदावरी अर्बनने देशामध्ये कार्यक्षेत्र वाढवावे – पद्मश्री डॉ. लहाने......................२०
* देवगिरी नागरी सहकारी बँकेचा सहकार भारतीच्या वतीने सत्कार ........................२१
* पतसंस्थेत ठेवींचे व्याजदर किती असावेत? .............................................२२
* कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळेची यशस्वी सांगता.........................................२३
* सहकारी पतसंस्थांना QR Code हवाच................................................२४
* नांदणी सहकारी बँक ५०० कोटींचा टप्पा लवकरच ओलांडेल ..........................२५
* ‘विकसित भारत २०४७’ आणि सहकारी क्षेत्राची भूमिका ..............................२६
* देशातील पहिले सहकार विद्यापीठ सहकार चळवळीसाठी दिशादर्शक .................२७
* देवगिरी नागरी सहकारी पतसंस्थेचा नवीन सदस्य करण्याचा संकल्प...................२९
* नागरी सहकारी बँकांकडून रिझर्व बँकेच्या अपेक्षा .......................................३०
* जनता अर्बन को–ऑप. बँकेची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न ...............३१


## पुढील अंक : दिवाळी अंक (जोडअंक)

**सहकार सुगंध मासिकाचा पुढील अंक ऑक्टोबर आणि नोव्हेंबर (जोडअंक) हा दिवाळी अंक म्हणून प्रकाशित केला जाणार आहे. याची जाहिरातदार, लेखक, प्रतिनिधी यांनी नोंद घ्यावी. – संपादक**

**‘सहकार सुगंध’** हे मासिक **मालक,** सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी **प्रकाशक** भालचंद्र वसंत कुलकर्णी यांनी **मुद्रक** विवेक श्रीधर देशपांडे यांच्या श्रीपाद प्रिंटर्स, शॉप नं.२, कोणार्क उद्योग, स.नं. १७७, एरंडवणा, पुणे ४११ ००४ येथे छापून ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. **संपादक** – भालचंद्र वसंत कुलकर्णी

**‘Sahakar Sugandha’** monthly is owned by Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., Published by Bhalchandra Vasant Kulkarni at Office No. 15, Vishnu Priya Apartment, Ganeshmala, Sinhagad Road, Pune 411 030 Printed by Vivek Shridhar Deshpande at Shripad Printers, Shop No. 2, Konark Udyog, S.N. 177, Erandwane, Pune 411 004. **Editor :** Bhalchandra Vasant Kulkarni

**सप्टेंबर २०२५ (वर्ष २१, अंक ०६)**

**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०९)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)

**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**
**संचालक मंडळ :**
डॉ. उदय जोशी (संचालक, राष्ट्रीय अध्यक्ष)
सीए सतीश मेढी (संचालक, राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर (संचालक)
श्री. भालचंद्र कुलकर्णी (व्यवस्थापकीय संचालक)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
डॉ. उदय जोशी (राष्ट्रीय अध्यक्ष)
श्री. दीपक चौरसिया (राष्ट्रीय महामंत्री)
श्री. दीनानाथ ठाकूर (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
श्री. दत्താराम चाळके (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. शरद जाधव (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर, श्री. सतीशजी मराठे,
श्री. ज्योतिंद्रभाई मेहता, श्री. विष्णूजी बोबडे,
श्री. संजय परमणे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे

**दि. १ जानेवारी २०२५ पासून वर्गणीचे नवीन दर**
**वार्षिक वर्गणी :** रु. ७००/– फक्त
**त्रैवार्षिक वर्गणी :** रु. १८००/– फक्त
**खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.**
**Please Visit : www.sahakarsugandha.org**

**कृपया चेक / डीडी ‘सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.’ या नावाने पाठवावा.** (पुणे येथे देय असलेला)

**सहकार सुगंध कार्यालय :**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, ५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे – ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

# ग्रामीण अर्थव्यवस्थेत सहकाराचे महत्त्व!

भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला दिशा देण्यात सहकारी संस्थांचे योगदान अमूल्य आहे. भारताची ग्रामीण अर्थव्यवस्था ही शेतकरी, शेतमजूर, कारागीर व लघुउद्योजक यांच्या श्रमावर उभी आहे. पण या श्रमशक्तीला संघटित करून उत्पादनक्षम बनवण्याचे कार्य सहकारी चळवळीने केले. विशेषतः महाराष्ट्रात सहकारानेच ग्रामीण समाजाला बळ दिले. शेतकऱ्यांना संघटित करून त्यांना बाजारपेठ मिळवून देणे, कर्जाची सोय करणे, शिक्षण-आरोग्य-सामाजिक सुविधा उपलब्ध करून देणे या सर्व गोष्टी सहकारातून साध्य झाल्या. मात्र गेल्या तीन-चार दशकांत सहकारी संस्था या 'सदस्यांच्या मालकीच्या संस्था' न राहता 'नेत्यांच्या खाजगी मालमत्ता' बनल्या, ही वस्तुस्थिती नजरेआड करता येणार नाही.

सहकारी साखर कारखाने, दुधसंघ, बँका, पतसंस्था, महिला बचत गट, शेती उत्पादन संस्था अशा अनेक प्रकारांनी सहकाराने ग्रामीण समाजाला आत्मनिर्भरतेचा मार्ग दिला आहे. 'सर्वांसाठी सर्वांनी' ही सहकाराची व्याख्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष जीवनात आणली. लहान शेतकऱ्यांना सामूहिक शक्ती देऊन त्यांना बाजारपेठेपर्यंत पोहोचवणे, कर्जाची सोय करणे आणि नफा वाटून घेणे या तत्त्वांवर सहकारी संस्था उभ्या राहिल्या.

सन १९५० नंतर महाराष्ट्रात साखर सहकारी चळवळ फोफावली. १०० हून अधिक सहकारी साखर कारखाने उभारले गेले, ज्यांनी केवळ साखर उत्पादन नाही तर ग्रामीण भागात शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, रस्ते बांधले. लाखो लोकांना रोजगार मिळाला. अनेक राजकीय नेते आणि शेतकरी नेते याच कारखान्यांतून घडले. कोल्हापूर, सांगली, पुणे, अहिल्यानगर आदी भागात दूध संघांनी श्वेतक्रांती घडवली. शेतकऱ्यांना थेट दूध विक्रीची संधी मिळाली, मध्यस्थांचा हस्तक्षेप कमी झाला. गोकुळ, वारणा, मुळशी, अहिल्यानगर अशा संस्थांनी दूध उद्योगाचा चेहरा मोहरा बदलला.

महाराष्ट्र हे देशातील सर्वात मोठे साखर उत्पादक राज्य. देशातील साखर उद्योगात महाराष्ट्र राज्याचा वाटा तब्बल ३५ टक्के इतका आहे. राज्यातील साखर उद्योगाची मुळे खोलवर समाजात रोवलेली आहेत. साखर हा फक्त एक उद्योग नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. या उद्योगात सहकारी व खाजगी अशा दोन पद्धतीने कारखान्यांची उभारणी झालेली आहे. मात्र गेल्या काही दशकांत सहकार क्षेत्रातल्या अडचणी, भ्रष्टाचार व राजकीय हस्तक्षेपामुळे खाजगी कारखान्यांना अधिक बळ मिळताना दिसत आहे. त्यामुळेच सन २०१० नंतर तर अनेक सहकारी कारखाने कर्जबाजारी झाले आणि लिलावात खाजगी उद्योगपतींच्या ताब्यात गेल्याचे चित्र आहे. खाजगी कारखाने, व्यावसायिक उद्योग यांचे मुख्य ध्येय फक्त नफा असतो, यात कुठेही सर्वसामान्य शेतकरी नफ्याचा वाटेकरी होतांना दिसत नाही. महाराष्ट्रात एकूण २०० पेक्षा जास्त साखर कारखाने कार्यरत आहेत. यापैकी सुमारे ९९ कारखाने सहकारी, तर १०८ कारखाने खाजगी क्षेत्रात आहेत. मागील १५ वर्षांत ५० हून अधिक सहकारी कारखाने बंद होऊन खाजगी उद्योजकांच्या हातात गेले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांपैकी सुमारे ६५ टक्के शेतकरी आज खाजगी कारखान्यांवर अवलंबून आहेत.

सहकार क्षेत्राने ग्रामीण महाराष्ट्र घडवला हे नाकारता येणार नाही. ऊसाला दर देणे, गावोगावी रोजगार निर्माण करणे, शाळा, बँका, दुधसंघ, रस्ते उभारणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ग्रामीण नेते घडवणे. या सर्व गोष्टी सहकारी साखर कारखान्यांनी केल्या. सहकार चळवळीतूनच महाराष्ट्रात शेतकरी संघटनांना बळ मिळाले. पण हळुहळू हे कारखाने 'जनतेचे' न राहता 'नेत्यांचे' झाले. कारखान्यांमध्ये पारदर्शकतेपेक्षा राजकीय गटबाजी व नफ्याचे वाटप महत्त्वाचे ठरले आहे.

महाराष्ट्रात २ लाखांहून अधिक सहकारी संस्था कार्यरत आहेत. यामध्ये साखर, दूध, पतसंस्था, बँका, बाजार समित्या, सूत गिरण्या, प्रक्रिया उद्योगांचा समावेश आहे. राज्यातील २.५ कोटीहून अधिक लोक सहकारी चळवळीशी थेट जोडलेले आहेत. ग्रामीण रोजगारात सहकारी संस्थांचा वाटा सुमारे ३० टक्के असल्याचे मानले जाते. ग्रामीण अर्थव्यवस्थेतील पतपुरवठ्याचा कणा म्हणजे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि प्राथमिक पतसंस्था. ७० टक्क्यांहून अधिक ग्रामीण पतपुरवठा या डीसीसी बँकांकडूनच केला जातो. यामुळे शेतकऱ्यांना पीककर्ज, जनावरांसाठी कर्ज, घरकर्ज यांची उपलब्धता झाली.

दुर्देवाने सहकार चळवळीत राजकीय हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात वाढला. साखर कारखाने आणि बँकांच्या निवडणुका या विधानसभा-लोकसभा निवडणुकांची पूर्वतयारी बनल्या आहेत. संचालक मंडळात असणे म्हणजे सत्तेच्या केंद्रात प्रवेश. संस्थांचा नफा शेतकऱ्यांऐवजी पक्षीय गटबाजी आणि निवडणुकीच्या खर्चाकडे वळवल्याचे दिसते. अनेक सहकारी साखर कारखाने आज कर्जबाजारी होऊन लिलावाच्या उंबरठ्यावर आले आहेत. गेल्या १५ वर्षांत ५० हून अधिक सहकारी साखर कारखाने बंद पडून खाजगी धनदांडग्यांच्या हातात गेले आहेत. यामुळे शेतकऱ्यांचा सहकारावरील विश्वास कमी होत चालला आहे आणि युवकांना रोजगाराच्या स्थिर संधी कमी झाल्याचे चित्र आहे. सहकार हा विकासाचे साधन न राहता सत्तेसाठीचे साधन ठरला आहे, हे लक्षात घ्यावे लागेल.

सहकाराला पुन्हा बळ द्यायचे असेल तर सहकारी संस्थांनी केवळ साखर-दूध यापुरते मर्यादित न राहता प्रक्रिया उद्योग, ऊर्जा, कृषी पर्यटन अशा नव्या क्षेत्रांत पाऊल टाकले पाहिजे. महिलांचा व युवकांचा सहकारात सक्रिय सहभाग वाढवण्याची गरज आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेत सहकार हा महत्त्वाचा भाग आहे. त्याने महाराष्ट्राला विकास, शिक्षण, रोजगार आणि नेतृत्त्व दिले आहे. पण राजकीय हस्तक्षेपामुळे सहकार काहीसा विस्कळीत झाला आहे. सहकार पुन्हा मुख्य प्रवाहात आणायचा असेल तर तो राजकारणाच्या पिंजऱ्यातून मुक्त करावा लागेल. सहकारातील कार्यकर्त्यांनी यासाठी सक्रिय होऊन ही चळवळ सक्षम करण्याकडे लक्ष दिले पाहिजे. जय सहकार!



संपादकीय...




# सहकार भारतीच्या विणकर सेलच्या पहिल्या राष्ट्रीय अधिवेशनाचे उद्घाटन

**छत्तीसगढ –** सहकार भारतीच्या विणकर सेलच्या दोन दिवसीय पहिल्या राष्ट्रीय अधिवेशनाचे उद्घाटन छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री, सहकार मंत्री अरुण साव, वाणिज्य मंत्री केदार देवांगन, खादी ग्राम उद्योगाचे अध्यक्ष लखनलाल देवांगन, एपेक्स बँकेचे अध्यक्ष राकेश पांडे, सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी, राष्ट्रीय सरचिटणीस दीपक चौरसिया यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

विविध राज्यांतील विणकरांनी उभारलेल्या स्टॉल्सचे उद्घाटनही करण्यात आले. उपमुख्यमंत्री अरुण सावजी यांनी सहकाऱ्यातून समृद्धी आणि विणकरांच्या उन्नतीसाठी सरकारच्या पाठिंब्याबद्दल मनोगत व्यक्त केले. सहकार मंत्री केदार देवांगन यांनी सहकार भारतीकडून सहकार संस्थांच्या उन्नतीसाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचे कौतुक केले. वाणिज्य मंत्री लखन लाल देवांगन यांनीही सहकार्यासाठी सरकारकडून केल्या जाणाऱ्या प्रयत्नांची चर्चा केली.

कार्यक्रमाला उपस्थित असलेले तज्ज्ञ आणि अधिकारी, ज्यात सहकार विभागाचे ओएसडी के. एन. कांदे, इफ्कोचे महाव्यवस्थापक संतोष शुक्ला, राष्ट्रीय हातमाग व्यवस्थापक डॉ. आशिष, यूपीकेएचे अध्यक्ष अमरेश कुशवाह यांचा समावेश होता. देशाच्या विविध भागातील यशस्वी विणकरांनी त्यांच्या यशोगाथा सांगितल्या, डॉ. अंगिका कुशवाह आणि आंध्र प्रदेशातील श्रीनिवासन प्रमुख होते. चौथ्या सत्रात लोकगायिका श्रीमती अलका चंद्राकर आणि आसाममधील विणकर बहिणींनी त्यांचे सादरीकरण केले.

# विणकरांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांची विक्री ऑनलाईन पद्धतीने व्हावी -मराठे



**छत्तीसगढ –** विणकरांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांची विक्री ऑनलाईन पद्धतीने करण्यात यावी, अशी सूचना आरबीआय व नाबार्ड संचालक आणि सहकार भारती संस्थापक सदस्य सतीश मराठे यांनी यावेळी बोलताना केली. यापुढील काळात ही व्यवस्था अधिक व्यापक व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. दोन दिवसीय अधिवेशनात ते बोलत होते.

अधिवेशनाच्या समारोप करताना राज्यपाल रेमन डेका यांनी स्पष्ट केले की, सहकार क्षेत्रात काम करताना विश्वास आणि प्रामाणिकपणे काम करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे उत्पादनांना मोठ्या प्रमाणावर बाजारपेठ उपलब्ध व्हावी, असे ते म्हणाले.

छत्तीसगढचे कृषीमंत्री रामविचार नेताम यांनी सांगितले की, या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्यांची संख्या हळुहळू कमी होताना दिसते आहे आणि म्हणूनच या व्यवसायाच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. सहकार भारतीचे राष्ट्रीय महामंत्री दीपक चौरसिया यांनी विणकरांच्या विविध प्रश्नांचा आढावा घेतला आणि मागणीपत्र अधिवेशनात मांडले. त्याला सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पाचपोर यांनी सांगितले की, या क्षेत्राला देशात मोठी परंपरा आहे. देशाच्या विकासात या क्षेत्राचे मोठे योगदान आहे. त्यामुळे त्यांच्या विकासासाठी सामुहिक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.



# सहकारी बँकांसाठी आधार प्रमाणीकरण चौकटीची निर्मिती




**नवी दिल्ली –** आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाचे निमित्त साधून भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाच्या वतीने सहकारी बँकांना आधार आधारित प्रमाणीकरण सेवा प्रदान करण्यास सक्षम करण्यासाठी एक नवीन चौकट तयार केली आहे. सहकार मंत्रालय, नाबार्ड, एन.पी. सी.आय. यांनी ही चौकट तयार केली आहे. यात देशातील ३४ राज्य सहकारी बँका आणि ३५२ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांचा समावेश आहे.

नवीन प्रणाली अंतर्गत आधार सेवा, अवलंबवण्याची प्रक्रिया सोपी करण्यात आली आहे. राज्य सहकारी बँका या युआयडिएआयकडे प्रमाणीकरण वापरकर्ता संस्था आणि ई-केवायसी वापरकर्ता संस्था म्हणून नोंदणीकृत असणार आहेत. जिल्हा बँक आणि राज्य सहकारी बँक यांचे आधार प्रमाणीकरण सुविधा घेऊ शकणार आहेत. यामुळे एकूण खर्चात बचत होणार आहे आणि कामकाज सुरळीत होऊ शकणार आहे.

सहकारी बँक या चौकटीच्या माध्यमातून ग्राहकांना जलद, सुरक्षित आणि सुलभ ऑनबोर्डिंग सेवा देण्यासाठी या चौकटीचा वापर करू शकतात. ग्राहकांना याचा नक्कीच फायदा होणार आहे. ही चौकट सहकारी बँकांना आधार सक्षम पेमेंट सिस्टिम अधिक बळकट करते. आधारची व्याप्ती आणि प्रभाव वाढविण्यात हे महत्त्वपूर्ण पाऊल असणार आहे.

## नाबार्डच्या संचालकपदी सतीश मराठे यांची नियुक्ती



**मुंबई –** सहकार भारतीचे संस्थापक सदस्य आणि आरबीआय संचालक सतीश मराठे यांची केंद्र सरकारच्या अर्थ मंत्रालयाच्या वतीने नुकतीच नाबार्डच्या राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. बँकिंग, सहकार आणि ग्रामीण विकास या क्षेत्रातील मराठे यांचा प्रदीर्घ अनुभव लक्षात घेऊन केंद्र सरकारने त्यांची नियुक्ती केली आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे ग्रामीण भागातील शेती, सहकार आणि बँकिंग क्षेत्रातील कार्याला नवीन दिशा मिळणार आहे.

## राज्यातील महिला सेवा सहकारी संस्थांना शासनाची कामे देणार - मुख्यमंत्री

**मुंबई –** राज्यातील महिला सेवा सहकारी संस्थांना यापुढील काळात शासनाच्या माध्यमातून कामे देण्यात येणार आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले आहे. आमदार चित्रा वाघ यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मुंबई भाजपा अध्यक्ष आशिष शेलार आदि यावेळी उपस्थित होते. समाजात महिलांचा सहभाग ५० टक्के आहे असे नमूद करून ते म्हणाले, त्यामुळे महिलांच्या विकासाला सर्वाधिक प्राधान्य असणार आहे. महिलांसाठी सुरू करण्यात आलेल्या शासकीय योजना बंद केल्या जाणार नाहीत. त्यामुळे त्यांची प्रगती कोणीही थांबवू शकणार नाही. आगामी २०२९ मध्ये होणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत त्यांचा मोठा सहभाग असणार आहे.

राज्यात तीन हजार महिला सेवा सहकारी संस्थांची स्थापना करण्यात आली असून या संस्थांच्या महासंघाची नोंदणी झाली आहे या संस्थांना सरकारची विविध कामे आणि कंत्राटे देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळास दोन हजार कोटी रुपयांचे अनुदान मंजूर

**नवी दिल्ली –** राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळास दोन हजार कोटी रुपयांची आर्थिक अनुदान देण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने नुकतीच मान्यता दिली आहे. हे अनुदान सन २०२५-२६ ते २०२८-२९ या कालावधीसाठी असणार आहे, अशी माहिती केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितली.

हे महामंडळ चार वर्षाच्या कालावधीत खुल्या बाजारातून २० हजार कोटी उभारण्यासाठी सक्षम असणार आहे. या निधीचा वापर नवीन प्रकल्प, उभारण्यासाठी अथवा सहकारी संस्थांना कर्ज उपलब्ध करण्यासाठी आणि खेळत्या भांडवलाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी करता येणार आहे. या अनुदानाचा फायदा दूध व्यवसाय, पशुधन, मत्स्य व्यवसाय, साखर, कापड, अन्न प्रक्रिया, गोदाम, शीतगृह अशा विविध घटकांना होणार आहे. देशाच्या विविध राज्यात सुमारे १३,२८८ सहकारी संस्था कामगार, महिला याबरोबर २.९ कोटी सदस्य यांना फायदा होणार आहे.

## सहकार भारती बँक प्रकोष्टचे राष्ट्रीय अधिवेशन १० व ११ सप्टेंबरला जयपूरला

**राजस्थान, जयपूर –** सहकार भारती बँक प्रकोष्टचे राष्ट्रीय अधिवेशन येत्या दि. १० आणि ११ सप्टेंबर रोजी जयपूर येथे होत असून उद्घाटन आरबीआय संचालक सतीश मराठे यांच्या मुख्य भाषणाने होणार आहे. राजस्थानचे मुख्यमंत्री आणि सहकार मंत्री हे यावेळी उपस्थित राहणार आहेत. राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते अधिवेशनाची सांगता होणार आहे.

दोन दिवसीय अधिवेशनात सायबर सुरक्षा, बँकेत गुणवत्तापूर्ण कर्मचारी आणि सेवाभावी संस्कृती, डिजिटल बँकिंग बिझनेस इंटेलिजन्स यावर विशेष व्याख्यानांचे सत्र होणार आहे. तसेच आर्थिक स्थिरता आणि व्यवस्थापन, भांडवली खर्चाचे नियोजन, आगामी काळातील ध्येय आणि संकल्प, यशस्वी बँकांचे अनुभव आणि विविध उपक्रम यावर विशेष सत्र होणार आहेत. याखेरीज मुलाखती, अशा विविध कार्यक्रमांचा समावेश असणार आहे.

## राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका लांबणीवर

**मुंबई –** राज्याच्या विविध भागांत होणाऱ्या जोरदार पावसामुळे राज्यातील सहकारी संस्थाची निवडणूक प्रक्रिया तूर्तास स्थगित करण्यात आल्या आहेत. या निवडणुका येत्या ३० सप्टेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आल्या आहेत. याबाबत सहकार विभागाकडून निर्णय जाहीर करण्यात आला आहे.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या वतीने राज्यांतील अ आणि ब वर्गातील सहकारी संस्थाची निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये साधारणपणाने ३१८८ संस्थांचा समावेश आहे. त्यातील अ आणि ब वर्गातील सहकारी संस्थांची संख्या २८५ इतकी आहे. राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस सुरू आहे. त्यातच शेतकरी वर्ग खरीप हंगामात व्यस्त आहेत. सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# सहकारी पतसंस्थांच्या आयकर प्रश्नाबाबत अर्थमंत्र्यांसमवेत बैठक घेणार : केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचे सूतोवाच

**कोपरगाव** – राज्यातील सहकारी पतसंस्थासमोरील आयकराचा प्रश्न सोडविण्यासाठी नजीकच्या काळात केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांच्यासमवेत चर्चा करण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितली.

सहकारी पतसंस्थांच्या विविध समस्यांची चर्चा करण्यासाठी येथे बैठक झाली. त्यानंतर ते बोलत होते. राज्य सहकारी पतसंस्था महासंघाचे अध्यक्ष काका कोयटे, राहता तालुका सहकारी महासंघ अध्यक्ष राजेंद्र वाबळे, संचालक स्वाधीन गाडेकर उपस्थित होते. ते म्हणाले, सहकार चळवळ सशक्त ठेवण्यासाठी विखे कुटुंबियांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यांनी केलेल्या शिफारसी पूर्ण करण्याचा नक्कीच प्रयत्न करण्यात येईल.

अध्यक्ष कोयटे यांनी सांगितले की, आयकर कायदा कलम ८० अंतर्गत सहकारी पतसंस्थांना करात सवलत आहे. मात्र, आयकर आकारण्यात येतो आहे. सहकारी बँकांमधील गुंतवणुकीवर टीडीएस आकारण्यात येत आहे. याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. पतसंस्थांना सिबिल स्कोअरमध्ये समाविष्ट करणे, तसेच क्लिअरिंग हाऊसचे सभासदत्व याबरोबर अन्य मागणी बाबत चर्चा करण्यात आली.



केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ

# सरस्वती पतसंस्थेचे 'आदर्श' पतसंस्थेत विलीनीकरण होणार

**रायगड** – सरस्वती महिला नागरी सहकारी पतसंस्था अलिबागच्या आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेमध्ये विलीनीकरण करण्याचा ठराव आदर्श पतसंस्थेच्या २७ व्या वार्षिक सभेत मंजूर करण्यात आला. संस्थेची वार्षिक सभा आदर्शचे अध्यक्ष अभिजित पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदयराव जोशी उपस्थित होते.




पतसंस्थेच्या पिंपळभाट व पोयनाड या दोन शाखांसाठी स्वमालकीच्या जागा खरेदी करणे, रामराज शाखेसाठी यापूर्वी खरेदी करण्यात आलेल्या मोकळ्या प्लॉटवर बांधकाम करून तेथे शाखेचे कामकाज सुरू करणे, सभासदांना ११ टक्के लाभांश देणे हे ठराव मंजूर करण्यात आले.

आदर्शतर्फे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जिल्हा पोलीस कल्याण निधीला प्रत्येकी एक लाख रुपये मदतीचे धनादेश देण्यात आले. नाना शंकर शेठ यांच्या पुण्यतिथी निमित्ताने संस्थेमध्ये घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. निबंध स्पर्धेत शाखाधिकारी कौस्तुभ म्हात्रे यांनी प्रथम, चेंढरे शाखाधिकारी रेश्मा पाटील यांनी द्वितीय, कुरुळ शाखाधिकारी प्रियांका जगताप-वाळंज व चोंढी शाखा सहशाखाधिकारी श्रीराज पावशे यांना तृतीय क्रमांकाचे पारितोषिक विभागून देण्यात आले. सूत्रसंचालन संस्थेचे मुख्याधिकारी उमेश पाटील यांनी केले.




# जयश्रीराम नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे गुणवंतांचा सत्कार

**रायगड** – मुरूड तालुक्यातील दहावी व बारावीत सर्वप्रथम उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा व सदस्यांच्या पाल्यांचा प्रशस्तीपत्रे व रोख रक्कम देऊन श्रीराम पतसंस्थेचे अध्यक्ष दिलीप जोशी व संचालकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पतसंस्थेची ३१ वी वार्षिक सर्वसाधारणसभा पार पडली.

प्रारंभी श्रीराम मूर्तीचे पूजन ज्येष्ठ सदस्य जनार्दन महादेव गायकर यांचे हस्ते करण्यात आले. प्रास्ताविकात अध्यक्ष जोशी यांनी पतसंस्थेकडे भाग भांडवल ३ कोटी २६ लाख रुपये असून ५४ कोटींहून अधिक ठेवी असल्याचे सांगितले. तसेच ७२ लाख नफा झाला आहे. सलग १२ वर्षे १२ टक्के लाभांशांची परंपरा या वर्षी ही कायम राखल्याचे नमूद केले. आगामी वर्षात एकत्रित व्यवसाय ११० कोटींपर्यंत जाईल, असा विश्वास व्यक्त केला.आर्थिक पत्रकाचे वाचन समीर उपाध्ये यांनी केले.

यावेळी ऊपाध्यक्ष मेघराज जाधव यांनी संस्थेला जिल्हा कार्यक्षेत्राची परवानगी मिळाल्याने बोर्ली-पंचतन व चेंढरे (अलिबाग) येथे शाखा विस्ताराचा प्रस्ताव मांडला त्यास एकमताने सर्व सदस्यांनी मंजूरी दिली. मोहन तांबडकर, बाळकृष्ण कासार, सुनिल विरकुड, डॉ. संजय पाटील, डॉ. अमित बेनकर, प्रमोद उपाध्ये, समीर उपाध्ये, अशोक दिवेकर, जयश्री जोशी, अश्विनी पाटील, सरव्यवस्थापक संजय ठाकूर उपस्थित होते.

सभासदांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. पसायदाने सभेचा समारोप झाला.

# साखर कारखाने कृषी प्रक्रिया केंद्रे व्हावीत - सतीश मराठे यांची अपेक्षा

## पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकार अध्यासनातर्फे पुणे विद्यापीठात आयोजित राज्यस्तरीय परिषदेत वैचारिक मंथन



**राज्यस्तरीय साखर परिषदेत नाबार्डचे संचालक सतीश मराठे यांचा सन्मान करताना पुणे विद्यापेठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर. डावीकडून डॉ. मुकुंद तापकीर, माजी साखर आयुक्त शेखर गायकवाड, उजवीकडे प्रा. अनिल कारंजकर.**

**पुणे** - साखर कारखान्यांचे अर्थकारण मजबूत करायचे असेल, तर ते वर्षभर चालायला हवेत. त्यासाठी ते केवळ साखर किंवा उपपदार्थ उत्पादक न राहता, त्यांचे रूपांतर कृषी प्रक्रिया केंद्रांमध्ये (ग्रो प्रोसेसिंग हब) झाले पाहिजे, अशी अपेक्षा  सहकार आणि बँकिंग तज्ज्ञ सतीश मराठे यांनी व्यक्त केली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकार अध्यासनातर्फे आयोजित राज्यस्तरीय साखर परिषदेत, रिझर्व्ह बँक आणि नाबार्डचे संचालक मराठे बोलत होते. डॉ. विखे पाटील यांच्या १२५ व्या जयंतीनिमित परिषद आयोजित करण्यात आली होती. प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, माजी साखर आयुक्त शेखर गायकवाड, विश्वगुरू इन्फोटेकचे राजेंद्र गांगर्डे, सहकार भारती माजी प्रदेशाध्यक्ष डॉ. मुकुंद तापकीर, डॉ. रवींद्र शिंगणापूरकर, अध्यासनाचे प्रमुख प्राध्यापक डॉ. अनिल कारंजकर, श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखान्याचे अध्यक्ष पांडुरंग राऊत, कार्याध्यक्ष विकास रासकर, राज्यातील विविध साखर कारखान्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. उपस्थित होते. पत्रकार नंदकुमार सुतार संपादित, पद्मश्री डॉ. विखे पाटील यांच्यावरील 'शुगरटुडे' मासिकाच्या विशेषांकाचे प्रकाशन झाले.

**⁕ साखर कारखाने वर्षभर चालावेत -**

साखर उद्योगाच्या आर्थिक उत्कर्षासाठीचा मार्ग सांगितला, असे नमूद करून ते म्हणाले, मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक असलेले साखर कारखाने अवघे दोन-तीन महिनेच चालतात. जगाच्या पाठीवर अशा स्वरूपाचा सीझनल चालणारा कोणताही उद्योग नाही. त्यामुळे या उद्योगाने उत्पादन वर्षभर कसे चालेल, याचा विचार करायला हवा आणि त्यासाठी साखरेबरोबरच इतर कृषी उत्पादनांवरही भर देऊन साखर कारखाने वर्षभर चालणारी कृषी प्रक्रिया केंद्रे म्हणून उभी करावीत, अशी सूचना त्यांनी केली.

**⁕ विद्यापीठात प्रथमच साखर परिषद -**

डॉ. कारंजकर यांनी प्रस्ताविकात, परिषदेच्या आयोजनामागील उद्देश सांगितला. परिषदेतील सूचनांचा अहवाल केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्यापर्यंत पोहचवला जाणार आहे. डॉ.काळकर यांनी संगितले की अशा स्वरूपाची परिषद पहिल्यांदाच विद्यापीठात आयोजित केल्याबद्दल अध्यासनाचे कौतुक केले.

**⁕ दिवसभरात चार चर्चासत्रे -**

परिषदेत उद्घाटन सत्रासह चार चर्चासत्रे झाली. दुसऱ्या चर्चासत्रात यशदाचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड, साखर उद्योग तज्ज्ञ दिलीप पाटील, राज्य सहकारी बँकेचे माजी व्यवस्थापकीय संचालक अजित देशमुख, 'विस्मा'चे कार्यकारी संचालक अजित चौगुले, लेखा परीक्षक तानाजी जाधव यांनी सहभाग घेतला. गायकवाड यांच्या खुमासदार सूत्रसंचलनामुळे चर्चासत्र रंगतदार

**पुढील पानावर...**



**राज्यस्तरीत साखर उद्योग एकदिवसीय परिषदेच्या उद्घाटनाचे छायाचित्र**

# साखर उद्योगात उपपदार्थ निर्मितीसाठी एआय वर भर हवा - सहकारमंत्री पाटील

## साखर उद्योगासाठी लवकरच नवे धोरण जाहीर करणार

**पुणे** – राज्यातील साखर उद्योगासाठी नजीकच्या काळात नवे धोरण जाहीर करण्यात येणार असून या माध्यमातून उपपदार्थाला प्राधान्य देण्याबरोबर या क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता एआय वापर वाढविण्यावर भर दिला जाणार आहे, असे राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले. वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या परिषदेत ते बोलत होते.

राज्याचे साखर आयुक्त सिद्धराम सालीमठ, विस्माचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे, कार्यवाह पांडुरंग राऊत आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमात विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये सर्वोत्कृष्ट ऊस विकास पुरस्कार पुणे जिल्ह्यातील श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना, तांत्रिक आणि नवीनतम गटात पुरस्कार सातारा येथील जयवंत शुगर्सला, जैव ऊर्जा आणि जैवइंधन गटात कोल्हापूरच्या श्री गुरुदत्त शुगर्स, आर्थिक व्यवस्थापन गटात नाशिकच्या द्वारकाधीश साखर कारखाना, सामाजिक दायित्त्व गटात दालमिया भारत शुगर कारखाना तर सर्वोत्कृष्ट साखर कारखाना गटात धाराशीव येथील नॅचरल शुगर अँड अलाईड कारखाना यांना प्रदान करण्यात आला आहे. दिवसभराच्या परिषदेत विविध विषयांवर सादरीकरण करण्यात आले. त्यामध्ये भारतीय साखर उद्योग क्षेत्रातील परिवर्तन आणि भविष्याचा मार्ग, साखर उद्योग क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आणि हरित हायड्रोजन उत्पादन या विषयाचा समावेश होता. यावेळी विस्मा मासिकाचे प्रकाशन करण्यात आले.

**※ उपपदार्थांकडे लक्ष देणे गरजेचे –**

सहकार मंत्री पाटील यांनी सांगितले की, साखरेच्या उत्पादनाबरोबर अन्य उपपदार्थ याकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. त्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्याची गरज असून कमी पाण्यात ऊस शेती कशी करता येईल हे पाहायला हवे तसेच माती परीक्षण, पाण्याचा वापर, ठिबक सिंचन उसाचे नवे वाण आणि मुख्य म्हणजे ऊसाचा गाळप कालावधी वाढविणे याकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. या नवीन धोरणाच्या माध्यमातून या क्षेत्राला नवी दिशा देण्याचा प्रयत्न आहे असे त्यांनी सांगितले.




**विस्माच्या वतीने आयोजित केलेल्या एकदिवसीय राज्यस्तरीय साखर उद्योग परिषदेचे उद्घाटन करताना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील. डावीकडे साखर आयुक्त सालीमठ, उजवीकडे विस्मा अध्यक्ष बी.बी. ठोंबरे, सचिव पांडुरंग राऊत, कार्यकारी संचालक अजित चौगुले.**

**※ साखर उद्योगाचा अहवाल शासनाला सादर –**

साखर आयुक्त सालीमठ यांनी भाषणात नवीन साखर धोरणाबाबत सविस्तर माहिती सांगितली. ते म्हणाले, नवीन अहवाल तयार करून शासनाला देण्यात आला आहे. त्यामध्ये उपपदार्थ उत्पादन, ऊसाचा नवीन वाण, कमी पाण्यातील ऊस शेती आदी बाबींचा विचार करण्यात आला आहे. गेल्या दहा वर्षांतील गाळप हंगामाचा विचार केला तर १५० दिवस गाळप हंगाम सुरू राहिला, असे सात वेळा घडले आहे. एका वर्षी ७२ दिवस तर दोन वर्षे १५० पेक्षा कमी कालावधीसाठी हंगाम सुरू राहिला आहे. राज्यातील ७५ टक्के साखर कारखाने हे दुष्काळी भागात आहेत. यापुढील काळात कमी पाण्यात उस शेती करण्याचा विचार करण्याची गरज आहे. एकीकडे एफआरपीसाठी स्पर्धा सुरू आहे तर दुसरीकडे उसाचे क्षेत्र कमी होत आहे. राज्यात १६ लाख हेक्टर्सवरुन ते आता ११ लाख हेक्टर्स इतके राहिले आहे. ऊसाचे नवे वाण घेण्याकडे कल कमी आहे असे ते म्हणाले.

**※ खाजगी साखर कारखान्यांसाठी नवीन कल्पना –**

विस्मा अध्यक्ष ठोंबरे यांनी सांगितले की, राज्यात असोसिएशनचे १३३ कारखाने सदस्य आहेत. साखर उत्पादनात खासगी कारखान्यांचा वाटा ५० ते ५५ टक्के असून इथेनॉल उत्पादनात ७२ टक्के वाटा आहे. खासगी कारखान्यासाठी नवीन कल्पना राबविण्यात येत आहेत. साखर उद्योग क्षेत्रात एआय तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. यावेळी त्यांनी असोसिएशनच्या आजवरच्या वाटचालीचा आढावा घेतला. महेश देशमुख यांनी आभार मानले.

---

# साखर कारखाने कृषी प्रक्रिया केंद्रे व्हावीत - सतीश मराठे यांची अपेक्षा

झाले. सध्याच्या परिस्थितीत एकरकमी एफआरपी देण्यामधील अडचणींसोबत, व्यवस्थापनासमोरील आव्हाने यावर चर्चा झाली. या अडचणी सोडवल्या नाहीत तर साखर उद्योग फार काळ तग धरणे अशक्य आहे, असा चर्चेचा सूर होता.

**※ साखर उग्योगावर व्यापक चर्चा –**

कारखान्यांची आर्थिक शिस्त, नवे तंत्रज्ञान आणि ऊस विकास इ. वर तिसऱ्या सत्रात चर्चा झाली. अध्यक्षस्थानी श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखान्याचे चेअरमन पांडुरंग राऊत होते. तर मुख्य कार्यकारी अधिकारी डी. एम. रासकर, महिंद्र इन्फोटेकचे मंदार गडगे, ऊसतज्ज्ञ डॉ. सुरेश पवार यांनी सहभाग घेतला. कमी खर्चात साखर कारखाना कसा चालवता येतो, हे रासकर यांनी आपल्या कारखान्यात केलेल्या यशस्वी प्रयोगांचा उल्लेख करत, सोदाहरण स्पष्ट केले. कृत्रिम तंत्रज्ञानाचा वापर करून ऊस उत्पादन आणि उतारा लक्षणीयरीत्या वाढवणे शक्य आहे, यासाठी अत्यंत स्वस्त मॉडेल विकसित केले आहे, असे गडगे यांनी सांगितले. ऊस पिकाबाबतचे गैरसमज दूर केले पाहिजेत, असे आग्रही प्रतिपादन पवार यांनी केले.

समारोपाच्या सत्रामध्ये माजी साखर आणि सहकार आयुक्त, तसेच सहकारी संस्था निवडणूक प्राधिकारणाचे अध्यक्ष अनिल कवडे यांनी मार्गदर्शन केले. साखर आणि सहकार क्षेत्रातील विविध उदाहरणे सांगून त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना प्रेरित केले. डॉ. कारंजकर यांनी आभार मानले.

# बँकींग क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता : काळाची गरज



नितीन खर्चे
मो. नं. - ९४२२८ ९२७६८

बँकींग क्षेत्र हे प्रवाही आहे. त्यामुळे त्यामध्ये नवनवीन विचार प्रवाह, तंत्रज्ञान, संकल्पना इत्यादी काळानुरूप सातत्याने येणार. त्यामधील काही विचारप्रवाह, तंत्रज्ञान, संकल्पना आपल्याला स्वीकारावे लागणार. आता तर विज्ञान आणि तंत्रज्ञान इतके प्रगत झाले आहे की, समाजजीवनाचे विविध क्षेत्र उदारणार्थ उद्योग, व्यवसाय, शिक्षण, व्यापार, सेवा इत्यादी प्रभावित झाली आहेत. त्याला वित्तीय संस्था, सहकारी संस्था यासुद्धा अपवाद नाहीत. विशेषतः बँकींग क्षेत्रात तर विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा उपयोग क्रमप्राप्त झाला आहे. डिजिटल बँकींग, इंटरनेट बँकींग, पेपरलेस बँकींग इत्यादी प्रकार आता रूढ झाले आहेत. अलिकडे भर पडत आहे, ती कृत्रिम बुद्धिमत्तेची (Artificial Intelligence) म्हणजेच AI ची. बँका ऐतिहासिकदृष्ट्या तंत्रज्ञानाच्या बाबतीत नेहमीच आघाडीवर राहिल्या आहेत. बँकींग क्षेत्रात AI चा समावेश होऊन मोठा क्रांतीकारी बदल घडून येत आहे. बँकींगच्या भविष्यातील वाटचालीमध्ये AI अतिशय महत्वाची भूमिका बजावणार आहे.

**※ कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे काय?**

कृत्रिम बुद्धिमत्तेची व्याख्या अनेकविध प्रकारे केली जाते. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे मशीनच (सामान्यतः संगणक) मानवासारखी विचार करण्याची, शिकण्याची आणि निर्णय घेण्याची क्षमता होय किंवा कृत्रिम वस्तूने (संगणक) दर्शविलेल्या बुद्धिमान वर्तनास कृत्रिम बुद्धिमत्ता असेही म्हटले जाते. थोडक्यात मानवी बुद्धिमत्तेची नक्कल करणारे हे तंत्रज्ञान आहे.

एखाद्या यंत्राची व्यक्तीच्या बुद्धिप्रमाणे काम करण्याची क्षमता, आकलन करण्याची शक्ती, वेगवेगळे तर्क काढण्याची क्षमता, भिन्न परिस्थितीतून नवीन शिकण्याची शक्ती, समस्या समजून सोडविण्याची क्षमता, नाविन्यपूर्ण शोध लावणे इत्यादींचा समावेश हा कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये होतो. कृत्रिम बुद्धिमत्ता ही कॉम्पुटर विज्ञानाची एक प्रगत आणि उपनियोजित शाखा आहे.



जॉन मॅकार्थी यांना AI चे संस्थापक म्हटले जाते. १९५६ मध्ये डार्ट माऊथ कॉलेजमधील एका कार्यशाळेत AI संशोधन क्षेत्राची स्थापना झाली आहे असे मानले जाते. कालांतराने या तंत्रज्ञानाची मागणी खूप वाढू लागली आणि आवश्यकताही वाटू लागली. याला बँकींग क्षेत्र सुद्धा अपवाद नाही.

कोरोनाच्या कालावधीनंतर मनुष्यबळाऐवजी कृत्रिम बुद्धिमत्तेवरील अवलंबित्त्व वाढले आहे. या तंत्रज्ञानाचा वापर जगभरातील अनेक वित्तीय संस्थांकडून सुरू झाला आहे. नॅशनल बिझनेस रिसर्च इंस्टिट्यूट यांच्या पाहणीनुसार जगातील ३२% वित्तीय संस्थांनी AI तंत्रज्ञानाचा स्वीकार केला आहे.

**※ कृत्रिम बुद्धिमत्तेचे मुख्य उपयोग –**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा पुढील बँकींग क्षेत्रात उपयोग होऊ शकतो.

१) ग्राहक सेवा २) फसवणूक शोध आणि प्रतिबंध ३) कर्ज मूल्यमापन आणि कर्ज मंजूरी ४) जोखीम व्यवस्थापन ५) प्रक्रिया ऑटोमेशन ६) गुंतवणूक आणि संपत्ती व्यवस्थापन ७) ग्राहक निरिक्षण आणि नियमन ८) सुधारित सुरक्षा आणि ९) बँकींग समोरील आव्हाने आणि त्यावर मात करणे. १०) सायबर सुरक्षा ११) चॅट बॉट्स १२) डेटा संकलन आणि विश्लेषण १३) भाकित विश्लेषण इत्यादी.

**※ बँकींग मध्ये AI चे फायदे –**

१) AI मध्ये फसवणूक झाली असल्यास ती शोधली जाते आणि त्याच्या प्रतिबंधासाठी स्वयंचलित कार्य केले जाते.

२) बँकांना डेटा प्रोसेसिंग, विश्लेषण आणि डॉक्युमेंट प्रोसेसिंग, ग्राहकांशी संवाद आणि इतर कामांमध्ये जी मानवीय चूक घडू शकते ती कमी केल्या जाऊ शकते.

३) एकूणच बँकींगच्या संबंधातील विविध विभागातील कार्यक्षमतेत वाढ होते.

४) बँकींग संदर्भातील प्रत्येक प्रक्रिया जलद गतीने आणि अचूक होते. त्यामुळे सर्व कामे वेगवान पद्धतीने होतात.

५) ग्राहकांना तत्पर आणि समाधानकारक सेवा दिली जाणार असल्याने बँकेची विश्वासार्हता वाढीस लागते.

६) बँक ग्राहकांना नाविन्यपूर्ण उत्पादने आणि सेवा देऊ शकते.

**※ आर्थिक व्यवहारातील असुरक्षितता –**

AI मध्ये गोपनीयता आणि सुरक्षिततेची काळजी घेणे आवश्यक आहे. अनुभव बघता गुन्हेगार हे दोन पावले पुढे असणार. अशा वेळी ग्राहकांनी आपले लॅपटॉप, मोबाईल इत्यादी इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे पासवर्डस् वगैरे यांची प्रचंड काळजी घ्यावी लागेल. AI मध्ये एखादा पासवर्ड विसरला तर पुढचे व्यवहार अवघड जाऊ शकतात. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या फलस्वरूप बँकींग क्षेत्रात बेरोजगारीमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. AI तंत्रज्ञान वेगाने प्रगती जरी करीत असले तरी धोक्यांचीही शक्यता वर्तविण्यात येत आहे. भारतात सुरक्षित प्रणाली तयार करण्यासाठी काही मानके व चाचणी पद्धती निश्चित कराव्या लागतील, अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्यात AI सुरक्षा कायदा आहे.

कॉर्पोरेट जगतात बँकींग क्षेत्रात फार मोठे व्यवहारिक परिवर्तन घडून आले आहे. आधुनिक बँकींग तंत्रज्ञानामुळे आता वित्तीय व्यवसायाचे सगळे परिमाणच बदलले आहे. बँकांनी माहिती व तंत्रज्ञान आधारित धोका व्यवस्थापन पद्धती अंमलात आणली आहे. दर्जात्मक बँकींग सेवा, ए.टी.एम., टेलिबँकींग, कोअर बँकींग, मोबाईल बँकींग, इंटरनेट बँकींग आदी सेवा आता सहकारी बँकाही देण्यात अग्रेसर आहेत. या सर्वांमध्ये आता भर पडली आहे ती कृत्रिम बुद्धिमत्तेची.

थोडक्यात, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर ही आता काळाची गरज आहे. याकडे जी बँक दुर्लक्ष करेल, त्यांना भविष्यात अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. सध्याच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी बँकांनी आधुनिकतेची कास धरणे क्रमप्राप्त झाले आहे. बँकांनी आपल्या व्यवसायाची आर्थिक स्थिती, स्थानिक परिस्थिती, ग्राहकांच्या गरजा, संगणक जाणकार, तरूण पिढीचा विचार करून कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर हा व्यवसाय वृद्धीसाठी करावा लागेल. तसेच रिझर्व्ह बँकेच्या विविध नियमांचे आणि कायद्यांचे काटेकोरपणे पालन करणे शक्य होणार आहे. AI च्या मदतीने बँकींग क्षेत्र अधिक कार्यक्षम, सुरक्षित आणि ग्राहकाभिमुख होत चालले आहे. तरीदेखील AI चे धोके जाणून घेण्यासाठी काही काळ जावू द्यावा लागेल. त्यानंतर बँकिंग सेवा पूर्णपणे डिजिटल आणि स्मार्ट होण्यासाठी AI हे मुख्य माध्यम असेल हे मात्र निश्चित!

**– डॉ. नितीन खर्चे, अध्यक्ष**
**दि यवतमाळ अर्बन को-ऑप. बँक, यवतमाळ**
**मो. ९४२२८९२७६८** Email: nitinkharche59gmail.com

*****

# सॅफमधून सुटका, आता पी.सी.ए.चा झटका

भारतीय बँकिंग क्षेत्रामधील कमर्शियल किंवा व्यापारी बँकांवर रिझर्व बँकेचे संपूर्ण नियंत्रण असून नागरी सहकारी बँकांच्या बाबतीत मात्र अंशतः नियंत्रण आहे. जून २०२० मध्ये केंद्र सरकारने बँकिंग नियमन कायद्यामध्ये आमूलाग्र बदल करून रिझर्व बँकेचे नागरी बँकांवरील नियंत्रणाची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर वाढवलेली आहे. या बदलानंतर रिझर्व बँक ऑफ इंडियाने नागरी बँकांना सहकारी बँका म्हणून असणाऱ्या सवलती हळुहळू कमी करत अन्य व्यापारी बँकांच्या बरोबरीने निकष आणण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. त्यामध्ये अनेक बाबींबाबत हे बदल आता अंमलात येण्यास सुरुवात झाली आहे. त्यापैकीच एक प्रमुख बदल म्हणजे पर्यवेक्षीय बंधने अर्थात सुपरवायझरी ॲक्शन फ्रेम म्हणजे सॅफ या नियंत्रण प्रणालीमध्ये बदल केला असून पी.सी.ए. म्हणजेच प्रॉम्ट करेक्टिव्ह ॲक्शन ही व्यापारी किंवा कमर्शियल बँकांना लागू असणारी नियंत्रण प्रणाली आता नागरी बँकांना देखील लागू झाली आहे.



गणेश निमकर
९८२२५ ६८५५०

उपचारापेक्षा खबरदारी चांगली ('Prevention is better than cure') असे नेहमीच म्हटले जाते. रिझर्व बँक ऑफ इंडियाने देखील बँकांच्या आर्थिक आरोग्यावर लक्ष ठेवत असताना संकटांची चिन्हे दर्शवणाऱ्या बँकांच्या समस्या अधिक गंभीर होण्यापूर्वी ठेवीदारांचे हित जपण्यासाठी तसेच बँकांची एकूणच आर्थिक स्थिरता राखण्यासाठी सन २००२ पासून व्यापारी अथवा कमर्शियल बँकांसाठी पी.सी.ए. ही नियंत्रण प्रणाली सुरू केली आहे. त्याचबरोबर नागरी सहकारी बँकांच्या बाबतीत अशाच धर्तीवर नियंत्रण ठेवणे व वेळीच हस्तक्षेप करून बँकांचे बिघडणारे आर्थिक आरोग्य सुधारण्यासाठी सुपरवायझरी ॲक्शन फ्रेम म्हणजे सॅफ ही नियंत्रण प्रणाली सन २०१२ पासून सुरू केली होती.

या दोन्ही नियंत्रण प्रणालीमध्ये बँकांचा आर्थिक कमकुवतपणा कमी करण्यासंदर्भात बँकांवरती काही बंधने निर्धारित केली जातात. काही विशिष्ट कृती संदर्भात विशिष्ट कृती प्रतिबंधित देखील केल्या जातात. यामध्ये बँकांच्या कामगिरीचे रिझर्व्ह बँकेकडून वारंवार निरीक्षण व परीक्षण केले जाते व झालेल्या प्रगती बाबतचा आढावा घेऊन सुधारणात्मक उपाय योजना करणेबाबत सुचित केले जाते.

निर्धारित सुधारणा करण्याबाबत बँकांना काही कालमर्यादा दिली जाते. या कालमर्यादेमध्ये अपेक्षित प्रगती न दिसल्यास सर्व समावेशक बंधने लागू करून ठेवीदारांना ठेव संरक्षण रक्कम देण्याबाबतची कार्यवाही करण्यास सुरुवात केली जाते. म्हणजेच थोडक्यात त्या बँकेचे अस्तित्व हळुहळू संपवले जाते.

यापूर्वी रिझर्व बँकेची नागरी बँकांवर बँकेच्या आकारमानानुसार विशिष्ट नियंत्रण करण्याची पद्धत नव्हती. पूर्वी बँकेचा कोणताही आकारमान असला तरी सरसकट एकाच प्रकारचे निकष पूर्तता करण्याचे बंधन होते.

रिझर्व बँकेने नागरी सहकारी बँकांवर सूक्ष्म नियंत्रण करण्यासाठी आता चार प्रकारात वर्गीकरण केलेले असून यापुढे प्रत्येक वर्गीकरणानुसार निकष पूर्ती व नियंत्रण पद्धत बदलणार आहे. जे अनेक बदल झाले आहेत किंवा होत आहेत, त्या अनेक बदलांपैकी सुपरवायझरी ॲक्शन फ्रेम म्हणजे सॅफ बंधनांमध्ये केलेला बदल हा देखील खूप महत्त्वाचा बदल आहे

दिनांक ०१.०४.२०२५ पूर्वी सर्वच नागरी सहकारी बँकांसाठी सुपरवायझरी ॲक्शन फ्रेम म्हणजे सॅफ अंतर्गत नियंत्रण केले जात होते. मात्र आता दिनांक ०१.०४.२०२५ पासून रिझर्व बँक ऑफ इंडियाने या वर्गीकरणातील प्रथम म्हणजेच टियर एक वर्गीकरण असलेल्या (टियर एक बँका म्हणजे रु. १०० कोटी रुपयांपर्यंतच्या ठेवी असलेल्या नागरी बँका व कितीही रकमेच्या ठेवी असलेल्या सर्व युनिट (कोणतीही शाखा नसलेली) आणि पगारदार नागरी बँका समाविष्ट आहेत) बँकांसाठी पूर्वीचीच सुपरवायझरी ॲक्शन फ्रेम म्हणजे सॅफ नियंत्रण प्रणाली कायम ठेवली असून वर्गीकरण दोन ते चारमधील (रु. १०० कोटींचे पुढील रकमेच्या ठेवी असणाऱ्या बँका) बँकांसाठी मात्र व्यापारी अथवा कमर्शियल बँकांना लागू असणारी त्वरित सुधारणात्मक कृती अर्थात पीसीएच्या धर्तीवर ही नियंत्रण कार्यप्रणाली लागू केली आहे.

त्वरित सुधारणात्मक कृती अर्थात पीसीए ही नियंत्रण या कार्यप्रणालीमध्ये देखील आता सरसकट नियंत्रण पद्धती राहणार नसून, या वर्गीकरणात असणाऱ्या बँकांचे जोखीमनिहाय तीन प्रकारात उपवर्गीकरण केले जाणार आहे. हे उपवर्गीकरण प्रामुख्याने भांडवल पर्याप्तता प्रमाण, निव्वळ एनपीए व नफा क्षमता या तीन प्रमुख निकषांच्या आधारावर केले आहे. या उपवर्गीकरणानुसार त्या त्या बँकांवरचे निर्बंध अथवा बंधने यामध्ये बदल होणार आहेत. थोडक्यात ज्या बँकेची जोखीम अधिक असेल त्या बँकेवर अधिक नियंत्रण व बंधने येणार आहेत.

पूर्वीच्या सुपरवायझरी ॲक्शन फ्रेम म्हणजे सॅफ अंतर्गत असणाऱ्या नियंत्रण कार्यप्रणालीमध्ये ही तरतूद नव्हती तर या वर्गवारीतील सर्वच बँकांसाठी एकच निकष होते. आता त्वरित सुधारणात्मक कृती अर्थात पीसीए ही नियंत्रण या कार्यप्रणालीमधील या तीन उपवर्गीकरणामुळे रिझर्व बँकेला नेमकी कोणती बँक जास्त आर्थिक आजारी आहे किंवा कोणत्या बँकेचा आर्थिक आजार हा बळावत चालला आहे हे तातडीने समजते. त्यानुसार रिझर्व बँक त्या त्या बँकेवरचे नियंत्रण अथवा बंधनांमध्ये तातडीने बदल करणार आहे. या तिन्ही उपवर्गीकरणांमध्ये कोणत्याही उपवर्गीकरणात असणाऱ्या बँकेवर काही अनिवार्य बंधने राहणार आहेत. तसेच काही विवेकी अर्थात प्रुडेन्शिअल बंधने राहणार आहेत. अर्थात वर्गीकरणानुसार या बंधनांची अथवा नियंत्रणाची तीव्रतादेखील कमी जास्त होणार आहे.

पूर्वीच्या सुपरवायझरी ॲक्शन फ्रेम म्हणजे सॅफ व आताच्या त्वरित सुधारणात्मक कृती अर्थात पीसीएच्या बंधनांमध्ये रिझर्व बँकेने आमुलाग्र बदल केलेले आहेत. पूर्वीच्या सुपरवायझरी ॲक्शन फ्रेम म्हणजे सॅफ बंधनामध्ये रिझर्व बँक प्रशासकीय बाबींमध्ये कोठेही हस्तक्षेप करताना दिसत नव्हती. त्यामध्ये केवळ आर्थिक जोखीम विचारात घेऊन आर्थिक निकषांच्या आधारावरती बंधने व नियंत्रण सीमित होती. त्वरित सुधारणात्मक कृती अर्थात पीसीएच्या बंधनामध्ये रिझर्व बँकेने नागरी बँकांच्या प्रशासकीय बाबींमध्ये देखील (विशेषतः संचालक, कर्मचारी) यांच्या बाबतीत हस्तक्षेप केलेला दिसून येतो.

या बंधनांबाबतचा सविस्तर तपशील रिझर्व बँकेने त्यांच्या या संदर्भातील परिपत्रकामध्ये दिलेला आहे. नागरी सहकारी बँकांनी या संदर्भात या

पुढील पानावर...

# सोलापूर जिल्हा सहकार भारती आयोजित प्रशिक्षण वर्ग यशस्वी



**सोलापूर** – जिल्हा सहकार भारतीच्या वतीने सहकारी पतसंस्थांसाठी प्रशिक्षण आयोजित केले होते. जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड, उपनिबंधक डॉ. प्रगती बागल जिल्हा विशेष लेखापरीक्षक, उमाकांत पवार सोलापूर जनता सहकारी बँक, अध्यक्ष सुनिल पेंडसे सहकार भारती विभाग प्रमुख संतोष गायकवाड, सहकार भारती सहविभागप्रमुख नानासाहेब वाघमोडे जिल्हा अध्यक्ष किरण करकमकर, उपाध्यक्ष राजेंद्र कुलकर्णी विष्णू नागटिळक हे प्रमुख पाहुणे होते.

करकमकर यांनी प्रास्ताविक केले. गायकवाड यांनी वसुली तर वासुदेव काळे यांनी व्यवसाय वृद्धीसाठी मार्केटिंग व व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले. वसंत गुंड यांनी सहकारी पतसंस्था आणि इन्कम टॅक्स या विषयावर तर किरण पाटोळे यांनी सायबर सिक्युरिटी संबंधी विवेचन केले. महामंत्री यशवंत बुऱ्हाडे, सूर्यकांत पाटील, हनुमंत कोळी, प्राची धामणगावकर उर्मिला जहागीरदार, अमृता गोसावी, गणेश कदम, संतोष पंतोजी व सहकार भारतीच्या सर्व कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले.

# सामाजिक भावनेतून सहकार क्षेत्राचा विकास – दिलीप पाटील

**जळगाव** – सहकार हा सामाजिक भावनेतून निर्माण झाला असून परस्परांच्या सहकार्याने विकासाचा टप्पा गाठणे शक्य होणार आहे आणि ग्रामीण विकासाला हातभार लागणार आहे असे मत सहकार भारतीचे राष्ट्रीय पदाधिकारी दिलीप पाटील यांनी सांगितले. सहकार महर्षी प्रल्हादराव पाटील व्याख्यानमालेत ते बोलत होते. सहकार आणि विकसित भारत २०४७ हा विषय होता.

ते म्हणाले, युवकांनी भारतीय संस्कृती परंपरेत सहकार्याच्या माध्यमातूनच सामाजिक काम उभे केले आहे. महिलांनी देखील बचत गट आणि लघु, मध्यम उद्योगमधून देशासाठी महत्वाचे योगदान दिले आहे. ही परंपरा यापुढील काळात सुरू राहावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

रवींद्र पाटील यांनी सहकार महर्षी पाटील यांच्या सहकार चळवळीतील कार्य आणि योगदानाबाबत सविस्तर माहिती सांगितली. प्राचार्य गिरासे यांनी सहकार चळवळीबाबत भाष्य केले आणि आजवर वाटचाल कशी झाली याबाबत माहिती सांगितली. डॉ. शिवाजीराव पाटील यांनी सूत्रसंचालन तर डॉ. बाबासाहेब मोटले यांनी आभार मानले.

मागील पानावरून...

# सॅफमधून सुटका, आता पी.सी.ए.चा झटका

परिपत्रकाचा सखोल अभ्यास करून या निर्बंध किंवा बंधनामध्ये आपली बँक येणार नाही याची अधिक दक्षता घेण्याची गरज आहे. प्रत्येक बँकेने त्याबाबतचा वेळोवेळी आढावा घेऊन आपले आर्थिक आरोग्य बिघडलेले नाही ना? किंवा बिघडण्याच्या वाटेवर नाही ना? याची देखील तपासणी अथवा चाचपणी करून त्यवर स्वतःच उपाययोजना करून पथ्ये पाळणे गरजेचे आहे.

रिझर्व बँक ऑफ इंडिया ही सर्वच बँकांची निर्धारित कालावधीनुसार प्रत्यक्ष बँकेत येऊन तपासणी करत असते तसेच वेळोवेळी बँकेकडून विविध प्रकारची माहिती मागवून त्या माहितीचे विश्लेषण करून बँकेच्या आर्थिक आरोग्याचा आढावा घेत असते. प्रत्यक्ष तपासणीच्या वेळी रिझर्व बँक प्रत्येक बँकेचे आर्थिक आरोग्य व परिस्थिती पाहून त्या त्या बँकेच्या ठेवीदारांना ठेव रक्कम परत देण्याची सक्षमता असल्याची खात्री करत असते. या तपासणीनंतर रिझर्व बँक प्रत्येक बँकेला एक मानांकन (रेटिंग) किंवा ग्रेडेशन देत असते. रिझर्व बँकेच्या नियमानुसार हे मानांकन (रेटिंग) किंवा ग्रेडेशन अत्यंत गोपनीय स्वरूपाचे असून, कोणत्याही बँकेला ते जाहीरपणे प्रकट करता येत नाही त्याची गोपनीयता ठेवण्याचे बंधन बँकांवर असते. अशाच प्रकारे पर्यवेक्षीय बंधनांबद्दल देखील रिझर्व बँक कोठेही जाहीर प्रकटन न करता प्रत्येक बँकेच्या आरोग्याची कल्पना त्या त्या बँकेच्या व्यवस्थापनाला देत असते. एखाद्या बँकेचे आर्थिक आरोग्य तात्कालीक कारणामुळे कमकुवत होऊ शकते व त्यामध्ये नंतर सुधारणा देखील होऊ शकते. मात्र अशा स्थितीत दरम्यानच्या काळात ठेवीदारांमध्ये कोणत्याही प्रकारची घबराट किंवा ठेवीदारांमध्ये बँकेबद्दल अविश्वास निर्माण होऊ नये म्हणून रिझर्व बँक या गोपनीयता पालन करणेची दक्षता घेत असते.

रिझर्व बँक ऑफ इंडियाने सुपरवायझरी ॲक्शन फ्रेम म्हणजे सॅफ नियंत्रण प्रणाली बद्दलचे परिपत्रक रद्द करून याबद्दल नवीन त्वरित सुधारणात्मक कृती अर्थात पीसीएबाबतचे परिपत्रक जारी केले आहे. पूर्वीच्या रद्द झालेल्या परिपत्रकांमुळे ज्या बँकांवर अशी नियंत्रणे होती, ती नियंत्रणेदेखील रिझर्व बँकेने रद्द करण्यास सुरुवात केली आहे. मात्र रिझर्व्ह बँकेच्या या कृतीचा अनेक ठिकाणी वेगळा अर्थ घेतला जात आहे असे दिसून येते.

आता रिझर्व बँकेचे आमच्या बँकेवर यापुढे कोणतेच पर्यवेक्षीय बंधन किंवा नियंत्रण राहणार नाही. अशा थाटामध्ये काही बँका त्याची जाहिरात करताना दिसत आहेत. वास्तविक ही बाब बँकेचे सभासद व ठेवीदार यांचे पुरते मर्यादित स्वरूपात त्यांना समजण्याबद्दल कोणाचाच आक्षेप असणार नाही. परंतु जाहीररित्या त्याचे सेलिब्रेशन करणे हे देखील योग्य नाही. नजीकचे वैधानिक लेखा परीक्षण किंवा रिझर्व बँकेच्या नजीकच्या तपासणीच्या वेळी बँकेचे आर्थिक आरोग्य पुन्हा तपासले जाणार आहे आणि अशावेळी बँकेचे आर्थिक आरोग्य कमकुवत होत असल्याची लक्षणे दिसल्यास, त्या त्या वर्गवारीनुसार रिझर्व बँक पुन्हा बंधने लागू करणार आहे, हे बँकांनी विसरून चालणार नाही.

अनेक वेळेला बंधनातून मुक्त झाल्यावर मुक्त विहार करण्याचा मोह आवरत नाही आणि अशाच एखाद्या बेसावध क्षणी नेमके रिझर्व बँकेच्या ते निदर्शनास आल्यास बँक पुन्हा निर्बंधांमध्ये जाऊ शकते. रिझर्व बँक ऑफ इंडियाने एक प्रकारे नागरी बँकांना सध्या ही एक चांगली संधी दिलेली असून या संधीचा नागरी बँकांनी जास्तीत जास्त उपयोग करून भविष्यात आपली बँक सॅफ किंवा पीसीएच्या कोणत्याच बंधनात अडकणार नाही यासाठी अधिक दक्ष व सावध राहण्याची गरज आहे. थोडक्यात भविष्यात 'सॅफ मधून सुटका मात्र पीसीएचा बसला झटका' अशी परिस्थिती होणार नाही याची सतर्कता ठेवावी लागेल.

**– गणेश रामचंद्र निमकर, पुणे.**
**बँकिंग सल्लागार मोबाईल – ९८२२५६८५५०**
**बी. कॉम, जी. डीसीडए, सी.ए.आय.आय.बी.**
**ई मेल –nimkarganeshgmail.com** ❋❋❋

# सांगली जिल्हा सहकार भारती आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धा

**सांगली –** आंतरराष्ट्रीय सहकार वर्षनिमित्त सहकार क्षेत्रामध्ये विविध उपक्रम राबवले जात आहेत. याचा एक भाग म्हणून सांगली जिल्हा (ग्रामीण) सहकार भारतीच्या वतीने राज्यस्तरीय निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती सहकार भारतीचे जिल्हाध्यक्ष सुमंत महाजन, प्रदेश संपर्क प्रमुख संजय परमणे व निंबध स्पर्धेचे समन्वयक अर्थतज्ञ प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून व नेतृत्वात या निबंध स्पर्धा होत आहेत. निबंध स्पर्धेसाठी पुढील प्रमाणे विषय – महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे स्वरूप व महत्त्व. प्राथमिक विकास सोसायट्या (PACS) आणि ग्रामीण विकास, नागरी सहकारी बँकांचे विकासातील योगदान, आव्हाने. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि ग्रामीण विकास. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने – महत्त्व, समस्या. नागरी सहकारी पतसंस्थांचे स्वरूप, समस्या, उपाययोजना असे आहेत.

स्पर्धा सर्वांसाठी खुल्या असून संदर्भ साहित्य पुढीलप्रमाणे आहेत – महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षेपात. महाविद्यालयीन अभ्यासासाठीचे सहकार संदर्भ ग्रंथ. सहकार सुगंध. जिल्हा सहकारी बोर्ड-सहकारी प्रशिक्षण केंद्र. जी.डी.सी अँड ए, एल.डी.सी, एच.डी.सी. परीक्षेची पुस्तके, सर्व सहकारी संस्थांच्या वार्षिक अहवाल ऑडिट रिपोर्ट. साखर संचालनालय शिवाजीनगर. वैकुंठ मेहता राष्ट्रीय प्रबोधन सहकारी संस्था, पुणे. आणि गुगल इत्यादींमधून माहिती मिळेल अशी माहिती सांगितली.

यशस्वी स्पर्धकांना याप्रमाणे बक्षीस देऊन गौरवण्यात येणार आहे. प्रथम क्रमांक ५००० रूपये, द्वितीय क्रमांक ४००० रूपये, तृतीय बक्षीस ३००० रूपये, चतुर्थ क्रमांक २००० रूपये आणि उत्तेजनार्थ १००० रूपये याशिवाय पाचही विजत्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. सहभागी होणाऱ्या प्रत्येकाला डिजिटल प्रमाणपत्र दिले जाणार आहे. स्पर्धेचे नियम पुढील प्रमाणे कार्यक्षेत्र, व्याप्ती महाराष्ट्रापुरती मर्यादीत राहील, प्रति व्यक्ती प्रतिनिबंध प्रवेश शुल्क १०० रूपये राहील, तज्ञ परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील, निबंध सुमंत महाजन – अध्यक्ष सहकार भारती सांगली जिल्हा – महाजन उद्योग समुह, उद्योग भवन कचेरी रोड शिराळा जिल्हा सांगली येथे पाठवावेत, निबंधाची शब्दमर्यादा १००० ते १२०० इतकीच असावी (४ ते ५ पाने) निबंध मराठी आणि इंग्रजी या दोन भाषेतच असावेत. निबंध पाठवण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर राहील, स्पर्धेचा निकाल २५ आक्टोबर रोजी जाहीर केला जाईल. स्पर्धा बक्षीस वितरण नोव्हेंबर महिन्यातील सहकार सप्ताहामध्ये ईश्वरपूर अथवा सांगली येथे करण्यात येईल. निबंध सुवाच्च हस्ताक्षरात अथवा टाईप केलेले असावेत. निबंध लेखकांनी पूर्ण पत्ता आणि संपर्क नंबर लिहावेत. निबंध स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे. प्रवेश अर्ज ऑनलाईन करावेत – प्रवेशिका पाठविण्यासाठी ई-मेल dnsp.islampurgmail.com हा असून निबंधाची माहिती, प्रवेशिका व क्युआर कोड दत्त पतसंस्थेच्या https://www.dattapatsansthaislampur.in उपलब्ध आहे.

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील स्पर्धकांनी यात सहभाग नोंदवावा असे आवाहन सन्मवयक प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष सुमंत महाजन, प्रदेश संपर्क प्रमुख संजय परमणे, महामंत्री भारत निकम, महिला जिल्हाध्यक्ष सारीका मुळे यांनी केले आहे.

# जनता सहकारी बँकेत काळ, काम आणि वेग यावर भर देणार

**पुणे –** जनता सहकारी बँकेच्या नुकत्याच झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत काळ, काम आणि वेग या त्रिसूत्रीच्या आधारावर आगामी काळात अधिक प्रभावीपणे कामगिरी करण्याच्या दृष्टीने विचार करण्यात आला. बँकेचे अध्यक्ष रवींद्र हेजीब अध्यक्षस्थानी होते. बँकेची प्रगती, आर्थिक कामगिरी, कर्ज वसुली, कर्ज व्यवसायातील वाढ, करोत्तर निव्वळ नफा आदी बाबींचा आढावा घेण्यात आला. तसेच उपविधी बदल, अंदाजपत्रक मान्यता लेखापरीक्षक नियुक्ती आदि विषयांवर चर्चा झाली. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश कश्यप यांनी प्रश्नांना उत्तरे दिली. उपाध्यक्ष अलका पेटकर यांनी आभार मानले.







# राष्ट्रीय स्पर्धेत पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशनला प्रथम क्रमांक

**पुणे –** उत्तम कार्यपद्धती, नवीन उपकम आणि यशोगाथा यांचे आदान-प्रदान या विषयावरील राष्ट्रीय स्पर्धेत पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशनला प्रथम क्रमांक मिळाला आहे. नाबार्ड अंतर्गत बँकर इन्स्टिट्यूट ऑफ रूरल डेव्हलपमेंट या संस्थेच्या वतीने स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. लखनौ येथे पार पडलेल्या अखिल भारतीय परिषदेत आरबीआय संचालक सतीश मराठे यांच्या हस्ते असोसिएशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत शेळके यांनी हा पुरस्कार स्वीकारला. असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष मोहिते यांच्या नेतृत्वाखाली असोसिएशन कार्यरत आहे.

# सांगली अर्बन बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांना ७ टक्के लाभांश जाहीर




**सांगली –** सांगली अर्बन बँकेस २४-२५ या आर्थिक वर्षात १४ कोटी ६७ लाख इतका निव्वळ नफा झाला असून ठेवींमध्ये ९६ कोटींची वाढ होऊन एकूण ठेवी रु.१२७७ कोटी २१ लाख इतक्या झाल्या आहेत. सभासदांना ७ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे, अशी माहिती बँक अध्यक्ष गणेश गाडगीळ यांनी सांगितली.

सांगली अर्बन बँकेची ८९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. प्रा.सतीश होनराव यांनी सायबर सिक्युरिटी या विषयावर विस्तृत मार्गदर्शन केले. वक्ते होनराव यांचा परिचय संदीप कुलकर्णी यांनी करून दिला.

अध्यक्ष गाडगीळ म्हणाले की, कर्जामध्ये ७२ कोटी इतकी वाढ होऊन रु. ७६० कोटी ७२ लाख कर्जांचे वाटप झाले आहे. बँकेच्या एकत्रित व्यवसायात वाढ होऊन २००० कोटींचा टप्पा पार झाला आहे. बँकेच्या एनपीएमध्ये लक्षणीय घट होऊन निव्वळ एनपीएचे प्रमाण केवळ १.२२ टक्के इतके आहे. रिझर्व बँकेच्या निकषाप्रमाणे सी.आर.ए.आर. चे प्रमाण किमान १२ टक्के आवश्यक आहे. ते १४.९२ टक्के इतके झाले आहे. आगामी काळात शाखा विस्तार करणे आणि ग्राहकांसाठी नवीन अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त सेवा देणे शक्य होणार आहे, असेही अध्यक्ष गाडगीळ यांनी सांगितले.

बँकेने संचित तोटा भरून काढत सभासदांना लाभांश देत आहे. आधुनिकतेच्या जगात सभासदांना आवश्यक त्या आधुनिक सुविधा पुरविल्या जातील, असे आश्वासन गाडगीळ यांनी दिले. विविध ठराव मंजूर करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक यांनी विषयांचे वाचन केले.

सभेस उपाध्यक्ष सीए श्रीपाद खिरे, संचालक सीए अनंत मानवी, संजय पाटील, श्रीकांत देशपांडे, डॉ. रवींद्र आरळी, एच.वाय. पाटील, संजय धामणगावकर, शैलेंद्र तेलंग, सागर फडके, सागर घोंगडे, रणजित चव्हाण, सतीश मालू, कालिदास हरिदास, मनोज कोरडे, रवींद्र भाकरे, अश्विनी आठवले, स्वाती करंदीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक, सरव्यवस्थापक वासुदेव दिवेकर तसेच बँकेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिन कुलकर्णी यांनी तर सुहास दिवेकर यांनी पसायदान सादर केले.

## सांगली जिल्हा सहकारी बँकेचा एकूण व्यवसाय १६ हजार कोटी पेक्षा अधिक

**सांगली –** सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने एकूण व्यवसाय १६ हजार कोटींपेक्षा अधिक केला आहे तर एनपीए शून्य टक्के करण्यात बँक यशस्वी झाली आहे. नजीकच्या काळात राज्यातील पहिल्या पाच बँकात बँकेचा समावेश होणार आहे.

जिल्हा बँकेच्या ठेवीत चार वर्षांत ७८ टक्के वाढ झाली आहे. एकूण ठेवी ८ हजार ८९२ कोटी इतक्या झाल्या आहेत. तसेच कर्ज वाटप ३२ टक्के वाढले आहे. आता ते ७ हजार ८८ कोटी इतके झाले आहे. बँकेचा ग्रॉस एनपीए ७.५३ टक्के इतका झाला असून थकबाकी वसुलीसाठी प्रभावी यंत्रणा राबविली आहे. तसेच एनपीएचे प्रमाण वाढणार नाही, याची काळजी घेतली जात आहे.

## परदेशातील पतसंस्थेची महाराष्ट्रात १२० कोटी रुपयांची गुंतवणूक

**पुणे –** परदेशात असणाऱ्या पतसंस्थांनी आयटीआयमध्ये १२० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे दरवर्षी अंदाजे ५ ते ७ हजार युवकांना जागतिक दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण मिळण्याची संधी उपलब्ध होणार आहे. याबाबत शासनाचा कौशल्य विकास विभाग आणि बंदरे विभाग अटल सोल्युशन्स इंटरनॅशनल यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. अनंतराव पवार औद्योगिक प्रशिक्षण संस्था व्यवस्थापन परिषद सदस्य वैभव सोलनकर यांनी ही माहिती सांगितली. कराराच्या माध्यमातून मुंबई, पुणे, नाशिक, सिंधुदुर्ग, नागपूर येथील सहा निवडक आयटीआय संस्थांचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी १२० कोटींची गुंतवणूक करण्यात येणार आहे.

## पुणे जिल्हा बँक्स असोसिएशन संचालकपदी संजय शेवाळे

**पुणे –** पुणे जिल्हा बँक्स असोसिएशन संचालकपदी सन्मित्र सहकारी बँकेचे अध्यक्ष संजय शेवाळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. निवडीनंतर बोलताना ते म्हणाले, नागरी सहकारी बँकासमोर विविध आव्हाने असून त्याचा सामना करण्यासाठी असोसिएशनच्या माध्यमातून प्रयत्नशील राहणार आहे. तसेच बँक खातेदार आणि ग्राहक यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत, त्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत. रोजच्या कामकाजात तंत्रज्ञान आल्याने कामकाजात गतिमानता आली आहे.

## राज्य सहकारी संघाच्या अध्यक्षपदी प्रवीण दरेकर

**पुणे –** राज्य सहकारी संघाच्या अध्यक्षपदी भारतीय जनता पक्षाचे विधान परिषदेतील गटनेते प्रवीण दरेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. तसेच अध्यक्षपदी अर्जुन बोरूडे आणि मानद सचिवपदी रामदास मोरे यांची निवड करण्यात आली आहे. सहकारी संघाच्या निवडणुकीत सहकार पॅनलने २१ पैकी २० जागा जिंकल्या आहेत. नूतन संचालक मंडळाची बैठक नुकतीच झाली. त्यामध्ये वरील पदाधिकारी निवडण्यात आले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्रकाश जगताप यांनी काम पाहिले.

## कॅन्टोन्मेंट सहकारी बँकेचा ५३वा वर्धापन दिन साजरा

**पुणे –** येथील कॅन्टोन्मेंट सहकारी बँकेचा ५३वा वर्धापन दिन सूक्ष्म, लघु आणि मध्यम कर्ज योजनेचा प्रारंभ करून साजरा करण्यात आला. बँक अध्यक्ष कैलास कोंद्रे यांच्या हस्ते करण्यात आला. बँक संचालक, खातेदार, ग्राहक आणि नागरिक यावेळी उपस्थित होते.

## साधना सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी वंदना काळभोर

**पुणे –** साधना सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी वंदना काळभोर यांची तर उपाध्यक्षपदी विकास तुपे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. उपनिबंधक डी. एस. हौसारे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले.

# शिक्षक सहकारी बँकेला ९.१७ कोटींचा निव्वळ नफा, नेट एनपीए शून्य टक्के

**नागपूर –** शिक्षक सहकारी बँकेने नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ९.१७ कोटी रुपयांचा नफा मिळवला असून बँकेचा नेट एन.पी.ए. शून्य टक्के आहे. बँकेने यंदाही पुन्हा ऑडिट वर्ग 'अ' प्राप्त केल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष माजी आमदार अनिल सोले यांनी बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सांगितली.



बँकेच्या यंदाच्या आर्थिक वर्षात १९२१ कोटींहून अधिक व्यवसायाचा टप्पा गाठला आहे. एकूण ठेवी ११९० कोटींपेक्षा जास्त असून कर्ज वाटप ७३१ कोटी रुपये झाले आहे. भारतीय रिझर्व बँकेच्या मानकानुसार हवा असलेला कमीत कमी १२ टक्के सीआरएआर गाठत बँकेने तो १६ टक्क्यांवर नेला आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये नफ्यात वाढ झाल्याने २ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. बँकेने सभासदांना आर्थिक सेवा देण्याबरोबरच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे.

अध्यक्ष सोले म्हणाले की, सहकार क्षेत्रातील बदलते धोरण लक्षात घेता बँकेने कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. मोबाईल बँकिंग सुविधा आदींमुळे ग्राहकांना अधिक सुलभ सेवा मिळत आहेत. बँकेच्या भावी योजना आणि विस्ताराबाबत माहिती सांगण्यात आली. विविध शाखांमधून आणि सदस्यांकडून आलेल्या सूचनांचा अभ्यास करून विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. उपाध्यक्ष आमदार प्रवीण दटके, माजी आमदार नागो गाणार, महाव्यवस्थापक सुधाकर नखाते यांचा सत्कार करण्यात आला.

सूत्रसंचालन संचालक विवेक जुगादे यांनी तर अहवाल वाचन संचालक योगेश बन यांनी केले. सर्वसाधारण सभेला उपाध्यक्ष आमदार प्रवीण दटके, संचालक अनिल मुळे, भोलानाथ सहारे, योगेश बन, रंजीव श्रीरामवार, तुलाराम मेश्राम, सुनील पाटील, कल्पना पांडे, मनीषा वाकोडे, विनायक राजकारणे, विवेक जुगादे, रवींद्र येणुरकर, आशिष वांदिले, सतीश यादव, वंदना कोथळे, मुख्य कार्यकारी अधिकारी अल्पेशकुमार जोशी, मंडळातील सदस्य, कर्मचारी, विविध समित्यांचे प्रमुख उपस्थित होते.

# वर्धा सहकार भारती, जिल्हा उपनिबंधक संस्थांच्या वतीने सहकार परिषदेचे आयोजन

**वर्धा –** वर्धा जिल्हा सहकार भारती आणि जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकार परिषद' दि. ७ सप्टेंबरला येथे आयोजित करण्यात आली आहे. सहकार परिषदेस प्रमुख अतिथी सहकार राज्यमंत्री, पालकमंत्री डॉ. पंकज भोयर तर मुख्य मार्गदर्शक भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे, प्रदेश सहकार भारती महामंत्री विवेक जुगादे, विभागीय सहनिबंधक प्रविण वानखेडे, वर्धा जिल्हा उपनिबंधक गौतम वालदे उपस्थित राहणार आहेत.

सहकार परिषदेस जिल्ह्यातील पतसंस्था, बँकांचे संचालक, पदाधिकारी कर्मचारी वर्ग यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हा सहकार भारती, जिल्हा अध्यक्ष प्रभाकर कोळसे, मनोज पाचखेडे, श्याम खत्री, प्रशांत मुळे, भास्कर थोटे, तसेच वर्धा नागरी सहकारी बँकचे अध्यक्ष विनय देशपांडे माजी अध्यक्ष अनिल जोशी, तेलंगराय नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष विनायक पोद्दार, उपाध्यक्ष सूर्यकांत महाजन, सचिव सुनिल पारसे, संचालक सुरेश काकडे, शाखा व्यवस्थापक रामभाऊ मोहदेकर, अरुण भालेराव, संदीप पोकळे, जिल्हा उपनिबंधक हे सहभागी होणार आहेत.

# यवतमाळ अर्बन बँक, रा.स्व. संघ आयोजित आरोग्य शिबिर यशस्वी

**यवतमाळ –** यवतमाळ अर्बन बँक, रा.स्व.संघ समदृष्टी क्षमता विकास नि अनुसंधान मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या सिकल सेल आणि थेलेसीमिया आरोग्य शिबिरात गरजूंची तपासणी करण्यात आली. जिल्हा उपनिबंधक नाना चव्हाण, बँक अध्यक्ष डॉ. नितिन खर्चे, उपाध्यक्ष अजिंदरसिंह चावला, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीधर कोहरे आदी उपस्थित होते. संजय दंडे यांनी प्रास्ताविक आणि राजेश तूरकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रकल्प समन्वयक विनय अंबुलकर यांनी मनोगत व्यक्त करून शिबिराविषयी माहिती सांगितली.

# यवतमाळ जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्थेचा १४ टक्के लाभांश जाहीर

**यवतमाळ –** यवतमाळ जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्थेची आमसभा नुकतीच पार पडली. सभेत सभासदांना १४ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. अध्यक्षस्थानी महेश सोनेकर होते. सभेत विविध विषयांवर चर्चा झाली आणि त्यास मंजूरी देण्यात आली. संस्थेला आर्थिक वर्षात ७ कोटी ३३ लाख ४४ हजार रूपयांचा नफा झाला आहे. भाग भांडवल ३६ कोटी १२ लाख रुपये असून गुंतवणूक १६६ कोटी इतकी करण्यात आली आहे, अशी माहिती सभेत सांगण्यात आली. संस्थेच्या सभेत उपस्थित केलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देण्यात आली.

# सहकार भारतीचे शिवाजी तायडे जिल्हाध्यक्षपदी

**बुलढाणा –** सहकार भारतीचे तालुका अध्यक्ष शिवाजी तायडे यांची मुंबईच्या मानद सहकार मंच समृद्धी फाऊंडेशनच्या बुलढाणा जिल्हाध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे. तसे नियुक्तीपत्र त्यांना देण्यात आले आहे. नियुक्तीनंतर ते म्हणाले, सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देणे, युवकांना सहकार क्षेत्राच्या प्रवाहात आणणे, ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांचे सबलीकरण यावर अधिक भर देण्यात येणार आहे.

# जनता सहकारी बँकेच्या वतीने स्वातंत्र्यदिन साजरा

**गोंदिया –** येथील जनता सहकारी बँकेच्या वतीने देशाचा ७९ वा स्वातंत्र्य दिवस उत्साहात आणि विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. बँक उपाध्यक्ष राजकुमार तिवारी अध्यक्षस्थानी होते. बँकेचे संचालक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश जोशी यांनी प्रास्ताविक तर श्रीमती उपासना दियेवार यांनी सूत्रसंचालन आणि आभार शाखा व्यवस्थापक शाम गोटे यांनी मानले.



# गोदावरी अर्बनने देशामध्ये कार्यक्षेत्र वाढवावे - पद्मश्री डॉ. लहाने

## ग्राहकांना ७ टक्के लाभांश जाहीर

**नांदेड** – गोदावरी अर्बनने अत्यंत कमी कालावधीमध्ये देशातील पाच राज्यांत कार्याचा ठसा उमटवला असून सहाव्या राज्यात शाखा उघडण्यासाठी परवानगी मिळाली आहे. संस्थेची वाटचाल पाहता येणाऱ्या काळात देशातील सर्वच राज्यात गोदावरी अर्बनचे कार्यक्षेत्र विस्तार होईल, असा विश्वास पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांनी व्यक्त केला. सभेत संस्थेच्या ग्राहकांना ७% लाभांश जाहीर करण्यात आला.

गोदावरी अर्बनची १२ वी वार्षिक सर्वसाधारण सभेत डॉ. लहाने बोलत होते. ते म्हणाले, मराठवाड्यातील एखाद्या पतसंस्थेने अत्यंत कमी कालावधीत ग्राहकांची विश्वासाहर्ता मिळवून उत्तुंग भरारी घेतली आहे. ही अभिमानास्पद बाब आहे. गोदावरी अर्बनच्या कर्मचाऱ्यांमध्ये आता जी जिद्द व चिकाटी निर्माण करण्यात आली आहे. त्यात अध्यक्ष राजश्री हेमंत पाटील यांची मोलाची भूमिका आहे.

संस्थेचे संस्थापकीय अध्यक्ष तथा आमदार हेमंत पाटील म्हणाले की, गोदावरी अर्बनचा वाढता आलेख सर्व कर्मचाऱ्यांच्या सचोटीने होत आहे. सर्वसामान्य नागरिकांना आधार देण्याचे काम गोदावरी अर्बन गेली बारा वर्षांपासून करीत आहे. संस्थेचे काटेकोर नियोजन व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर करीत आहेत.

अध्यक्ष राजश्री पाटील म्हणाल्या की, संस्थेची अध्यक्ष असली तरी एक विश्वस्त म्हणून काम पाहाते. संस्था कायमच सर्वसामान्यांच्या स्वप्नांना आकार देण्याचे काम करीत असून यापुढेही करीत राहील असा विश्वास दिला. माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा यांनी मनोगत व्यक्त केले. साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त प्रा. डॉ. सुरेश सावंत, शासनाचा कै. आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकारितेतील सर्वोच्च पुरस्कार प्राप्त लेखक तथा पत्रकार संदीप काळे व शासनाचा उत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार प्राप्त सचिन मोहिते यांचा सन्मान करण्यात आला.

कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी 'गोदावरी कार्निव्हल'चे आयोजन करण्यात आले होते. सहभागी स्पर्धकांपैकी अर्धापूर शाखेचे शाखाधिकारी सोमेश संगेवार 'गोदावरी किंग' तर सेन्ट्रल ऑपरेशन हब मुंबईच्या मनाली प्रधान यांची 'गोदावरी क्वीन' म्हणून निवड करण्यात आली. पुरस्काराचे स्वरूप एकावन्न हजार व सन्मानपत्र आहे. दरवर्षी संस्थेत उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा पुरस्कार देऊन सन्मान केला जातो.

प्रारंभी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांनी प्रास्ताविकात मागील सभेच्या इतिवृत्ताचे व अहवालाचे वाचन करताना संस्थेचा आर्थिक वर्षातील लेखाजोखा सादर केला. सन २०२४–२५ या आर्थिक वर्षात संस्थेच्या २७०० कोटी रुपयांच्या ठेवी असून ४७०० कोटींचा एकूण व्यवसाय संस्थेने केला. मागील वर्षीच्या तुलनेत १६.७६ टक्के इतकी वाढ संस्थेच्या एकूण व्यवसायात झाली आहे. ४२७ कोटींची तरलता गुंतवणूक, २१७८ कोटींचे कर्ज वितरण, ७०.०४% सि.डी. रेशो तर या आर्थिक वर्षात ४७ कोटी १९ लाख एकूण नफा झाला असून, सहकार कायद्यानुसार आवश्यक तरतुदी वजा जाता २७ कोटी ५४ लाख एवढा शुद्ध नफा झाला आहे. सूत्रसंचालन अर्धापूर शाखाधिकारी सोमेश संगेवार यांनी केले.

# देवगिरी बँक संचालक मंडळ कर्मचारी महासंघातर्फे सन्मानित



**छत्रपती संभाजीनगर** – देवगिरी नागरी सहकारी बँकेला रिझर्व्ह बँकेने नुकतीच शेड्यूल्ड बँक म्हणून मान्यता दिली असून, या यशाच्या पार्श्वभूमीवर देवगिरी बँक कर्मचारी महासंघातर्फे बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळ यांचा सत्कार करण्यात आला.

व्यासपीठावर बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे, उपाध्यक्ष उमेश दाशरथी, संचालक प्रशांत देशपांडे, संचालिका जयश्री किवळेकर, अमिता लेकुरवाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे रुपेंद्र कोयाळकर उपस्थित होते.

अध्यक्ष शितोळे यांनी बँकेच्या प्रगतीसाठी कर्मचाऱ्यांचा सहभाग अधोरेखित करत कर्मचाऱ्यांची बँकेप्रती असलेली निष्ठा आणि समर्पण याचा मोठा हातभार आहे असे सांगितले. कर्मचारी महासंघाचे पदाधिकारी अध्यक्ष भरत म्हस्के, श्रीराम सांगळे, संदीप औटे, जीवन राजूरकर, किरण गंगावणे उपस्थित होते. विविध गुणदर्शन कार्यक्रमात कर्मचाऱ्यांनी गाणी, वाद्यवादन या सादरीकरणातून कौशल्य सादर करत वातावरण रंगतदार केले.



# देवगिरी नागरी सहकारी बँकेचा सहकार भारतीच्या वतीने सत्कार

**छत्रपती संभाजीनगर –** देवगिरी नागरी सहकारी बँकेला भारतीय रिझर्व्ह बँकेकडून नुकताच शेड्यूल्ड बँक हा प्रतिष्ठेचा दर्जा मिळाला आहे. या यशाबद्दल सहकार भारतीतर्फे बँकेचा विशेष सत्कार करण्यात आला.

सत्कार सोहळ्यात सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश संघटन मंत्री शरद जाधव, सहकार भारती प्रशिक्षण केंद्र अध्यक्ष संजय बिर्ला, प्रदेश सहसंघटन मंत्री विजय देशमुख, प्रदेश सचिव सुनील मोतलग, प्रदेश सहकार भारतीचे पूर्णकालीन कार्यकर्ता प्रविण गायकवाड, तसेच बलवंत नागरी पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जयदीप शाह, संत ज्ञानेश्वर सहकारी पतसंस्थेचे संचालक आबासाहेब देशमुख उपस्थित होते.

देवगिरी बँकेच्या प्रगतीचे कौतुक करत हा दर्जा केवळ बँकेचा नव्हे, तर मराठवाड्यातील सहकार चळवळीचाही सन्मान असल्याचे वक्त्यांनी नमूद केले. शेड्यूल्ड बँक दर्जामुळे बँकेला रिझर्व्ह बँकेकडून थेट व्यवहार, शासकीय योजनांची अंमलबजावणी, स्थानिक स्वराज्य संस्थांची खाती, विदेशी चलन ठेवी स्वीकारणे आणि NABARD योजनांचा लाभ मिळणार आहे. बँकेच्या सेवा व विश्वासार्हतेला अधिक बळकटी मिळेल, असे त्यांनी सांगितले.

बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे म्हणाले, हा दर्जा हा आमच्या ग्राहक, भागधारक आणि कर्मचाऱ्यांच्या विश्वास व परिश्रमांचा गौरव आहे. समाजाच्या सर्व स्तरांसाठी उत्कृष्ट बँकिंग सेवा पुरवत राहू. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे उपस्थित होते.

# जळगाव जनता सहकारी बँक व्यवस्थापकीय संचालक संजय नागमोती सन्मानित

**जळगाव –** जळगाव जनता सहकारी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजय नागमोती यांना नुकताच राष्ट्रीय स्तरावरील पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. बँकेने एकूण व्यवसाय ३६०० कोटींपेक्षा अधिक केला असून नेट एनपीए शून्य टक्के राखण्यात यश मिळविले आहे. बँकेच्या वतीने वृक्षारोपणाचा उपक्रम यशस्वीपणाने करण्यात आला. बँक अध्यक्ष सतीश मदाने, संचालिका आरती हुजुरबाजार, संचालक मधुकर पाटील, नितिन चौधरी, उपमहाव्यवस्थापक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

नागमोती यांच्या यशाबद्दल बँकेचे पदाधिकारी, संचालक, अधिकारी तसेच खातेदार आणि हितचिंतकांनी त्यांचे अभिनंदन करून आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# पंढरपूर अर्बन बँकेला आर्थिक वर्षात ३८.४२ कोटी ढोबळ नफा

**पंढरपूर –** पंढरपूर अर्बन बँकेस सन नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात रू. ३८.४२ कोटी रूपयांचा ढोबळ नफा झाला असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष सतीश मुळे यांनी ११३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सांगितली.



बँकेचे कुटुंबप्रमुख आमदार प्रशांत परिचारक तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविकात बोलताना बँकेचे अध्यक्ष मुळे म्हणाले की, प्रधान कार्यालय व ३० शाखांसह कार्यरत असून बँकेच्या आर्थिक वर्ष मार्च अखेर ठेवी रू.१३९१.४७ कोटी, कर्जे रू.९१६.२४ कोटी असून एकूण रू.२३०७.७१ कोटी इतका मिश्र व्यवसाय झाला असून तरतूदी वजा जाता निव्वळ नफा २ कोटी २० लाख झाला आहे. बँकेचा सीआरएआर हा १३.८७ टक्के इतका तर मार्चच्या तुलनेत जून अखेर थकबाकी प्रमाण ३.३३ टक्क्यांपर्यंत खाली आणण्यात यश प्राप्त झाले. कर्ज योजनांना साडेआठ टक्क्यांपासून व्याजदर आहे. लहान-मोठे व्यावसायिक, व्यापारी व उद्योजक यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाच्या विविध व्याज परतावा कर्ज योजना ज्यामध्ये आण्णासाहेब पाटील महामंडळ, वसंतराव नाईक महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय महामंडळ, तसेच आई, अमृत अशा विविध समाजांमधील व्यावसायिक बांधवांच्या व्यवसाय वृद्धीसाठी व्याज परतावा योजनाद्वारे बँकेमार्फत कर्ज वाटप करीत आहे.

आमदार परिचारक म्हणाले की, कोरोना काळातील अडचणींमधून बँकेचे नवनियुक्त संचालकांनी वसुली कामकाज पाहात आज थकबाकी कमी करणेत यश मिळविले. लाभांशासाठी रिझर्व्ह बँकेकडे बँकेने प्रस्ताव दाखल केला आहे. अहवाल वाचन मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे यांनी केले.

# पतसंस्थेत ठेवींचे व्याजदर किती असावेत? पतसंस्था व्याजदराच्या ट्रॅपमध्ये अडकली आहे का?

पतसंस्थेतील ठेवींचे व्याजदर हा एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. राज्य पतसंस्थांना नियामक मंडळाने ठेवींच्या व्याजदरासंदर्भात अधिकतम मर्यादा घालून दिलेली आहे. (पतसंस्था/सअ/नि. मं. सभा/पतसंस्था व्याजदर /सन २०२२ १८२५), परंतु मल्टीस्टेट पतसंस्थांना अशी मर्यादा अद्याप तरी नाही. राज्य पतसंस्था असोत किंवा मल्टीस्टेट पतसंस्था असोत, यामध्ये ठेवींचे व्याजदर ठरवण्याच्या निश्चित अशा पद्धती क्वचितच आढळून येतात. आपल्या ठेवींचे व्याजदर किती असावेत, असा प्रश्न जर पतसंस्थांना विचारला, तर बहुतेक पतसंस्था हे व्याजदर बाजारातील इतर पतसंस्थांच्या तुलनेत किमान अर्धा ते एक टक्का अधिक ठेवतात. याशिवाय, ज्या स्थिरस्थावर पतसंस्था आहेत, त्या कर्जाची मागणी, चांगले कर्जदार आणि ज्या बँकेत गुंतवणूक केली जाते, त्यावरील व्याजदर यांचाही विचार करतात. अशा काही ढोबळ तत्त्वांवर ठेवींच्या व्याजदराची निश्चिती केली जाते.



मंगेश देहडेकर
९९२११३०४८११

ठेवींचा व्याजदर किती असावा, हा प्रश्न जर बँकांना केला, तर प्रत्येक बँकेची यामागील भूमिका वेगळी दिसून येते. पतसंस्थांप्रमाणे केवळ बाजारातील स्पर्धा हा निकष सहसा बँकांमध्ये आढळून येत नाही. सरकारी बँका किंवा व्यापारी बँका यांचे व्याजदर तर आरबीआयच्या रेपो रेटप्रमाणेच ठरवले जातात. बँकांमध्ये खालील काही पद्धती आहेत, ज्यावरून ठेवींचे व्याजदर निश्चित केले जातात; रेपो रेट, असेट लायबिलिटी मॅनेजमेंट (ALM) आणि बाजारातील कर्ज किंवा गुंतवणुकीच्या संधी.

आरबीआयला जेव्हा बाजारामध्ये पैसा उपलब्ध करून द्यायचा असेल किंवा बाजारातील पैसा कमी करायचा असेल, तेव्हा रिझर्व्ह बँकेकडे एक मोठे शस्त्र असते ते म्हणजे रेपो रेट. रिझर्व्ह बँकेने जर रेपो रेटमध्ये वाढ केली, तर बँकांना मिळणारा पैसा अधिक व्याजदराने मिळतो, ज्यामुळे बँका आपल्या कर्जाचा व्याजदर वाढवतात. वाढीव व्याजदराने कर्ज कमी प्रमाणात वाटप होते किंवा ग्राहक केवळ आवश्यक कारणांसाठीच कर्जाचा वापर करतो. आपोआपच अनावश्यक गोष्टींवरील खर्च कमी होतो व अनावश्यक वस्तूंची मागणी कमी होते व किमती स्थिर राहतात. याचा परिणाम बँकांच्या ठेवींच्या व्याजदरावरही होतो. बँका या काळात ठेवींचे व्याजदर कमी किंवा अधिक करतात, कारण ते कर्जाच्या मागणीशी संलग्न असतात आणि अतिरिक्त ठेवी पडून राहिल्यास बँकांना अनावश्यक व्याज देऊन तोटा सहन करावा लागतो. पतसंस्थांच्या बाबतीत अशा पद्धतीने व्याजाच्या बाबतीत निर्णय घेतो का, हा मुख्य प्रश्न आहे. वास्तविक पाहता, चांगले कर्जदार हे बँका आणि पतसंस्था दोघांनाही हवे असतात. चांगले कर्जदार हवे असतील, तर कर्जाचे व्याजदर कमीत कमी ठेवणे अपेक्षित आहे आणि कर्जाचे व्याजदर जर कमी ठेवायचे असतील, तर कमी व्याजदराच्या ठेवी पतसंस्थांनी स्विकारणे आवश्यक राहील.

रेपो रेटप्रमाणे एखाद्या भागातील अर्थव्यवस्थेचा अभ्यास करून पाहिल्यास, लक्षात येईल की, आपल्या पतसंस्थेच्या परिसरात कोणत्या कारणासाठी कर्जदार कर्ज घेत आहे किंवा आपल्या परिसरात यावर्षी दुष्काळ आहे की चांगला पाऊस आहे, शेतीचे उत्पन्न चांगले आहे की कमी होणार आहे, आपल्या भागात नवीन उद्योगधंद्यांची वाढ झाली आहे का, त्यामुळे रोजगार निर्मिती वाढली आहे का, त्या परिसरामध्ये किंवा त्या गावामध्ये नवीन दुकानांची स्थापना झाली आहे का, त्यामुळे बाजारपेठेमध्ये काही उठाव पाहायला मिळाला आहे का, सरकारी योजनेमधून शेतकरी, महिला वर्ग यांना काही मोठ्या प्रमाणावर कर्जपुरवठा उपलब्ध झाला आहे का? अशा गोष्टींचा जर अभ्यास केला, तर लक्षात येईल की, पतसंस्थेला या आर्थिक वर्षामध्ये चांगले कर्जदार मिळण्याचे प्रमाण किती राहू शकते. त्यावरून ठेवी स्वीकारायच्या किंवा नाही, याचा निर्णय घेतला पाहिजे. जर लक्षात आले की, गुंतवणुकीकरिता किंवा कर्जवाटपाकरिता अतिरिक्त फंड पतसंस्थेकडे आहे व बाजारामध्ये यावर्षी कर्जवाटप होण्याची परिस्थिती तेवढी चांगली नाही, तर अशा काळात पतसंस्थांनी देखील ठेवींचे व्याजदर कमी करणे अपेक्षित असते. या सर्वांचा इतर पतसंस्थांच्या ठेवींच्या व्याजदरांशी कोणताही स्पर्धात्मक संबंध न ठेवता, केवळ पतसंस्थेचे व्याजदर अधिकतम नफा कसा मिळवून देतील, यावर ठरवले गेले पाहिजे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) च्या धोरणांचा बँकांच्या ठेवींच्या व्याजदरावर महत्त्वाचा प्रभाव पडतो. RBIचे काही महत्त्वाचे धोरण व त्यांचा ठेवींच्या व्याजदरावरील प्रभाव खालीलप्रमाणे आहेतः रेपो दर हा RBI द्वारे निर्धारित केलेला मुलभूत व्याजदर असतो. RBI रेपो दर वाढवल्यास बँका ठेवींचे व्याजदर वाढवतात आणि रेपो दर कमी झाल्यास बँका ठेवींचे व्याजदर कमी करतात. रिझर्व्ह रेशो (CRR/SLR) मध्ये वाढ झाल्यास बँका कमी प्रमाणात कर्जे देऊ शकतात, त्यामुळे ठेवींच्या व्याजदरात वाढ होते. CRR व SLR कमी केल्यास बँका जास्त कर्जे देऊ शकतात. त्यामुळे ठेवींच्या व्याजदरात घट होते. मार्गदर्शक दर (Base Rate/MCLR) RBI मार्गदर्शक दर निर्धारित करते आणि या दराशी बँकांच्या ठेवींचे व्याजदर जोडले जातात. RBI मार्गदर्शक दर वाढवल्यास, ठेवींच्या व्याजदरातही वाढ होते आणि RBI मार्गदर्शक दर कमी केल्यास, ठेवींच्या व्याजदरातही कपात होते. तसेच, RBI द्वारे वेळोवेळी दिले जाणारे नीती निर्देश, संदेश व सूचना बँकांवर बंधनकारक असतात, ज्यामुळे बँका आपल्या ठेवींच्या व्याजदरात बदल करतात. अशा प्रकारे, RBI चे धोरण व निर्णय हे बँकांच्या ठेवींच्या व्याजदर ठरवण्यावर थेट परिणाम करतात.

पतसंस्थांमध्ये (Credit Societies) ठेवींच्या व्याजदर निश्चित करण्याची प्रक्रिया बँकांपेक्षा थोडी वेगळी असते. पतसंस्थांच्या व्याजदर निर्धारणावर प्रभाव टाकणारे घटक आणि त्यांची कार्यपद्धती खालीलप्रमाणे आहे:

पतसंस्था बहुतांश स्थानिक पातळीवर कार्यरत असल्याने, स्थानिक आर्थिक परिस्थिती, स्पर्धा आणि ग्राहकांच्या गरजा यांचा विचार करून व्याजदर ठरवले जातात. पतसंस्था सहकारी तत्त्वावर चालतात, त्यामुळे सभासदांच्या हिताचा प्राधान्याने विचार केला जातो आणि सभासदांना आकर्षक व्याजदर देण्याचा प्रयत्न केला जातो. पतसंस्थेची व्यवस्थापन समिती ठेवींचे व्याजदर ठरवते. समितीच्या बैठकीत आर्थिक स्थिती, ध्येय आणि धोरणे यांचा विचार करून निर्णय घेतले जातात. सहकार कायद्यानुसार व नियामक संस्थांच्या निर्देशानुसार व्याजदराच्या मर्यादा ठरवल्या जातात आणि या मर्यादांच्या आत राहूनच व्याजदर निश्चित केले जातात. पतसंस्थेची एकूण आर्थिक स्थिती, नफा-तोटा, कर्जवसुली इत्यादी बाबींचा विचार केला जातो, चांगली आर्थिक स्थिती असल्यास

पुढील पानावर...

## सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था आयोजित

# कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळेची यशस्वी सांगता

**कराड –** कृष्णाकाठ इन्स्टिट्यूट फॉर स्किल डेव्हलपमेंट अँड रिसर्च आणि सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने, जनकल्याण नागरी सहकारी पतसंस्था यांचे अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभाला सहकारी संस्था उपनिबंधक प्रदीप बर्गे सर, सहकार भारती (प्रशिक्षण) च्या पदाधिकारी व सहकार भारती प्रदेश कार्यकारिणी सदस्य अश्विनी आठवले. शिक्षण मंडळ सचिव चंद्रशेखर देशपांडे आदी उपस्थित होते. उपस्थित प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. चंद्रशेखर देशपांडे यांनी प्रशिक्षणाची आवश्यकता, संस्था कर्मचारी व अधिकारी यांच्यामधील परस्पर संबंध, याबाबत मार्गदर्शन केले.

सायबर सिक्युरिटी व डीजी लॉकर या विषयांवर शिक्षण मंडळ आयटी डिपार्टमेंटचे असिस्टंट डायरेक्टर अभिजीत पाटील यांनी प्रशिक्षण दिले.



कलम १४४, केवायसी व ग्राहक सेवा या विषयावर उपनिबंधक प्रदीप बर्गे यांनी मार्गदर्शन केले. ताणतणाव व्यवस्थापन, कार्यक्षमता या विषयांवर इन्स्टिट्यूटचे संचालक एस. के. कुलकर्णी यांनी संवाद साधला.

## तासगाव अर्बन सहकारी बँकेस महाराष्ट्र बँक्स असोसिएशनचा पुरस्कार प्रदान

**तासगाव, सांगली –** पद्मभूषण वसंतदादा पाटील उत्कृष्ट नागरी सहकारी बँक म्हणून तासगाव अर्बन सहकारी बँकेचा महाराष्ट्र बँक्स असोसिएशनच्या वतीने नुकताच पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात आला. राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, सहकार राज्यमंत्री पंकज भोयर आणि सारस्वत सहकारी बँक अध्यक्ष गौतम ठाकुर उपस्थित होते. बँक अध्यक्ष महेश्वर हिंगमिरे उपाध्यक्ष कुमार शेटे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत कुलकर्णी यांनी पुरस्कार स्वीकारला.

## कराड अर्बन मुख्य कार्यकारी अधिकारपदी धनंजय शिंगटे

**कराड –** कराड अर्बन बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारपदी धनंजय शिंगटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना विविध क्षेत्रातील लेखापरीक्षणाचा प्रदीर्घ अनुभव आहे. बँकिंग क्षेत्रात एका दशकापेक्षा अधिक काळ ते कार्यरत आहेत. बँक अध्यक्ष डॉ. सुभाष एरम, उपाध्यक्ष समीर जोशी, व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष डॉ. अनिल लाहोटी, कुटुंब प्रमुख सुभाष जोशी आदींनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## शरद सहकारी सूतगिरणीच्या अध्यक्षपदी बाबुराव देसाई

**कोल्हापूर –** शरद सहकारी सूतगिरणीच्या अध्यक्षपदी बाबुराव देसाई यांची तर उपाध्यक्ष अशोक फराकटे यांची निवड करण्यात आली.

सूतगिरणी अद्ययावत तंत्रज्ञानावर आधारीत उभारण्याचा मानस असून पहिल्या टप्प्यात १२५०० चा प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार आहे. सूतगिरणीच्या माध्यमातून युवकांना रोजगाराची संधी देण्याबरोबर अत्याधुनिक औद्योगिक प्रकल्पाचे तालुका वासियांचे स्वप्न साकार होणार आहे. नूतन संचालक सुभाषराव चौगले, जयवंत चोरगे, संजय पाटील, यशवंत नांदेकर, धैयशील भोसले, अशोक फराकटे, शहाजी देसाई, सुभाष चौगले, अनंत पाटील, संजय पाटील, रंगराव मगदूम, अतुल पाटील, जयवंत चोरगे, रामचंद्र शिऊडकर, दादासो पाटील, उमाजी पाटील, सुनिल जठार, बाळकृष्ण भोपळे, महादेव खोत, उमेश तेली, वैशाली डवर, विजया देसाई यांचा सत्कार करण्यात आला.

ज्येष्ठ नेते के. जी. नांदेकर, नंदकुमार सूर्यवंशी-सरकार, दत्ताजी उगले, कल्याणराव निकम, अरुण जाधव, जालंदर पाटील, अंकुश चव्हाण, सूर्याजी देसाई, निवास देसाई, शिवाजी ढेंगे, संदिप व्हरंडेकर, विजय बलुगडे, संग्रामसिंह सावंत, संजय पाटील, तानाजी चौगले, डॉ. सर्जेराव कवडे, अमित देसाई यांच्यासह प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

मागील पानावरून...

## पतसंस्थेत ठेवींचे व्याजदर किती असावेत ?

जास्त व्याजदर देऊ शकतात. जास्त कर्जाची मागणी असल्यास ठेवींचे व्याजदर वाढवले जातात, तर कमी कर्जाची मागणी असल्यास व्याजदर कमी केले जाऊ शकतात. जास्त मुदतीच्या ठेवींना सामान्यतः जास्त व्याजदर दिला जातो आणि मोठ्या रकमेच्या ठेवींना काही वेळा जास्त व्याजदर दिला जाऊ शकतो. आसपासच्या इतर पतसंस्थांच्या व्याजदरांचा अभ्यास करून त्यांच्याशी स्पर्धात्मक व्याजदर ठरवले जातात. काही वेळा विशेष योजनांतर्गत जास्त व्याजदर देऊ केले जातात. (उदा. ज्येष्ठ नागरिकांसाठी) तसेच, नियामक मंडळाने पतसंस्थांच्या व्याजदरावर काही प्रमाणात अंकुश ठेवला आहे आणि त्यांचे निर्देश पाळणे पतसंस्थेला बंधनकारक आहे. पतसंस्था या सामान्यतः लहान आणि स्थानिक पातळीवर कार्यरत असल्याने, त्यांच्या व्याजदर निर्धारणात लवचिकता आणि स्थानिक परिस्थितीचा जास्त परिणाम दिसून येतो.

थोडक्यात विश्लेषण करायचे झाल्यास, पतसंस्था आणि बँकांमधील ठेवींच्या व्याजदर निश्चित करण्याच्या पद्धती पाहिल्या. आता पतसंस्थांनी ठेवींचे व्याजदर ठरवण्याची अधिक योग्य पद्धत कोणती आहे, याचा निर्णय घ्यायचा आहे. सध्याच्या परिस्थितीत, काही पतसंस्था तोट्यात असण्याचे कारण हे ठेवींचे अवास्तव वाढलेले व्याजदर हे देखील आहे. ठेवी वाढवण्याची स्पर्धाच पतसंस्थांमध्ये लागली आहे, असे दिसते. वास्तविक पाहता, पतसंस्था किती मोठी व सुरक्षित आहे, हे तिच्याकडील ठेवींवरून नाही, तर वसूल भागभांडवल, रिझर्व्ह फंड व नफा यावरून ठरत असते. आणि नफा जर वाढवायचा असेल, तर ठेव व कर्ज यातील व्याजाचा दुरावा वाढला पाहिजे. याकरिता कर्जाचा व्याजदर वाढवणे म्हणजे चांगला कर्जदार गमावणे हा आहे आणि हा धोका संस्थेने कधीच पत्करू नये. मग, सर्वोत्तम पर्याय म्हणजे टप्प्याटप्प्याने ठेवींचे व्याजदर कमी करणे हाच आहे. बँकांप्रमाणे स्पर्धेऐवजी तांत्रिक बाबींचा अभ्यास करून व केवळ संस्थेचा नफा वाढवण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून व्याजदर निश्चित केला पाहिजे.

– मंगेश देहेडकर, को-ऑपरेटिव्ह ट्रेनर व कन्सल्टंट
मो.नं. – ९९२१३ ०४८११

*****

# सहकारी पतसंस्थांना QR Code हवाच

व्यवहारांना प्रोत्साहन देणारी ही सेवा ग्राहकांसाठी अत्यंत सोयीस्कर ठरली होती, ज्यामुळे दैनंदिन व्यवहार सुलभ झाले आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला एक नवा आयाम मिळाला. परंतु, रिझर्व्ह बँकेने या सुविधेवर आक्षेप घेतल्याने आणि ती बंद केल्याने पतसंस्थांच्या व्यवसायावर गंभीर मर्यादा आल्या आहेत, ज्यामुळे ग्रामीण विकासाच्या गतीला खीळ बसण्याची भिती निर्माण झाली आहे.




आरबीआयने पतसंस्थांच्या ग्राहकांची केवायसी अर्थात, ग्राहकांची ओळख पडताळणी अद्ययावत नसल्याचे कारण पुढे करत ही सुविधा बंद केली. अर्थात, आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणि सुरक्षितता राखण्यासाठी केवायसी नियमांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे, यात शंका नाही. मात्र, काही पतसंस्थांमधील आर्थिक गैरव्यवहाराच्या घटनांमुळे सगळ्याच पतसंस्थांवर, संशय घेणे आणि क्यूआर कोड सेवा पूर्णपणे बंद करणे, हा एक व्यापक परिणाम करणारा निर्णय ठरला आहे. नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने आरबीआयच्या निर्देशनानुसार ही सेवा बंद केली, ज्यामुळे लाखो ग्राहकांना मिळणाऱ्या सुविधेला अचानक ब्रेक लागला.

या निर्णयामुळे पतसंस्थांच्या व्यवसायावर थेट परिणाम झाला आहे. डिजिटल व्यवहार बंद झाल्याने ग्राहक इतर पर्यायांकडे वळू शकतात, ज्यामुळे पतसंस्थांचा ग्राहक वर्ग कमी होण्याची शक्यता आहे. क्युआर कोड सेवा केवळ सोयीस्करच नव्हती तर ती पतसंस्थांसाठी नवीन खातेदार आकर्षित करण्याचे आणि त्यांना नियमित व्यवहार करण्यास प्रोत्साहित करण्याचे एक प्रभावी माध्यम होते. ग्राहक दररोज क्यूआर कोडद्वारे व्यवहार करतील, यामुळे पतसंस्थांकडील ठेवी वाढतील. ज्यामुळे त्यांना कमी व्याजदरात कर्जे उपलब्ध करुन देणे शक्य होईल. ग्रामीण भागातील लघुउद्योजक, शेतकरी आणि सामान्य माणसाला शंभर टक्के केवायसी अपडेटेड आहेत, अशा पतसंस्थांना क्यूआर कोड सेवा पुन्हा सुरु करण्याची परवानगी देण्यात यावी, या मागणीत तथ्य आहे. ज्या पतसंस्था सक्षम आहेत, त्यांची आर्थिक शिस्त चांगली आहे आणि त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्विकार केला आहे. त्यांना डिजिटल व्यवहारांपासून वंचित ठेवणे हे त्यांच्या प्रगतीला आणि पर्यायाने ग्रामीण अर्थव्यवस्थेला मारक ठरु शकते.

पतसंस्थांनी स्वतःहून आरबीआयच्या मानकांप्रमाणे ग्राहकांचे शंभर टक्के केवायसी अपडेट करुन देण्याची तयारी दर्शवली आहे. ही एक सकारात्मक बाब आहे. जर पतसंस्था ही जबाबदारी घेण्यासाठी तयार असतील तर आरबीआयने यावर गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. कठोर अटी आणि नियम घालून परंतु त्याचबरोबर योग्य त्या तपासण्या करुन थर्डपार्टी क्यूआर कोड सेवा पुन्हा सुरु करण्यास परवानगी दिल्यास अनेक फायदे होतील. यामुळे डिजिटल भारताच्या संकल्पनेला अधिक बळकटी मिळेल. ग्रामीण भागातील लोकांना आधुनिक बँकिंग संकल्पनेला अधिक बळकटी मिळेल. ग्रामीण भागातील लोकांना आधुनिक बँकिंग सेवांचा लाभ घेता येईल आणि पतसंस्थांनाही स्पर्धेत टिकून राहता येईल.

यासंदर्भात, आरबीआयने एक संतुलित दृष्टिकोन अवलंबणे आवश्यक आहे. केवळ कठोर निर्बंध लादण्याऐवजी, एक सहकार्यात्मक भूमिका घेऊन पतसंस्थांना तंत्रज्ञान स्विकारण्यासाठी आणि नियमांचे पालन करण्यासाठी प्रोत्साहित करणे अधिक हिताचे ठरेल. त्यासाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्वे आणि अंमलबजावणीची प्रक्रिया तयार केली जाऊ शकते. ज्यामुळे पतसंस्थांना त्यांची केवायसी प्रक्रिया अद्ययावत करण्यास मदत होईल आणि त्याचबरोबर सुरक्षित आणि पारदर्शक क्यूआर कोड सेवा प्रदान करता येईल. ठराविक कालावधीत केवायसी पूर्ण करण्याची अट घालणे, नियमित ऑडिट करणे आणि नियमांचे उल्लंघन झाल्यास कठोर कारवाई करणे, हे सर्व करता येऊ शकते.

पतसंस्थांच्या क्यूआर कोड सेवेवरील निर्बंध हे ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या सुधारणांना मारक आहे. आरबीआयने यावर पुनर्विचार करुन, केवायसीचे नियम पूर्ण केलेल्या आणि पारदर्शकपणे व्यवहार करणाऱ्या पतसंस्थांना क्यूआर कोड सेवा सुरु करण्याची परवानगी द्यावी अशी मागणी केवळ पतसंस्थांची नसून ती ग्रामीण भारताच्या विकासाची आणि आर्थिक समावेशनाची गरज आहे. यामुळे पतसंस्था सक्षम होतील. ग्रामीण भागातील लोकांना सोयीस्कर सेवा मिळतील आणि एकंदरच देशाच्या आर्थिक प्रगतीला हातभार लागेल. हा केवळ आर्थिक व्यवहारांचा प्रश्न नसून लाखो लोकांच्या आर्थिक उन्नतीचा प्रश्न आहे आणि तो सोडवण्यासाठी धोरणात्मक लवचिकता आणि दूरदृष्टीची गरज आहे.

**श्री. उमाजी केळुसकर,**
**अलिबाग ज्येष्ठ पत्रकार**
**मोबाइल नं. – ९०११३ ६०१६८**
**(साभार – सहकार दर्शन पाक्षिकाच्या सौजन्याने)**

*****

# यवतमाळ अर्बन बँकेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान



**यवतमाळ –** दहावी आणि बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान यवतमाळ अर्बन बँकेच्या वतीने एका कार्यक्रमात करण्यात आला. बँकेच्या वतीने अनेकविध उपक्रम राबविण्यात येतात. त्यातील हा एक उपक्रम आहे. बँक अध्यक्ष डॉ. नितीन खर्चे अध्यक्षस्थानी होते. अध्यक्ष खर्चे यांनी यावेळी बँकेचा विविध उपक्रमांची माहिती आणि योजना सांगितल्या. व्यासपीठावर मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीधर कोहरे आणि संचालक उपस्थित होते. शशांक गौतमे यांनी सूत्रसंचालन, मिलिंद देशपांडे यांनी प्रास्ताविक व आभार राजेश तूरकर यांनी मानले.

# नांदणी सहकारी बँक ५०० कोटींचा टप्पा लवकरच ओलांडेल

**कोल्हापूर –** नांदणी सहकारी बँक नजीकच्या काळात ५०० कोटींचा टप्पा लवकरच ओलांडेल, असा विश्वास बँकेचे अध्यक्ष अप्पासाहेब लट्ठे पाटील यांनी व्यक्त केला आहे. बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच पार पडली, त्यावेळी ते बोलत होते. बँकेच्या वतीने सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आला.




तज्ञ संचालक सीए विद्यासागर वस्तवाडे यांनी स्वागत तर अध्यक्ष लट्ठे पाटील यांनी प्रास्ताविकात बँकेच्या वाटचालीची माहिती सांगून अहवाल सादर केला. उपाध्यक्ष राजेंद्र खुळ तसेच अन्य संचालक, अधिकारी, खातेदार उपस्थित होते. सभेत सायबर सिक्युरिटी यावर सीए धीरज देशपांडे यांनी सविस्तर विवेचन केले. या कार्यक्रमात उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांचा सन्मान करण्यात आला. विषय पत्रिकेवरील विविध विषयांना मंजुरी देण्यात आली. संचालक महेश परीट यांनी आभार मानले.

## आर्य चाणक्य सहकारी पतसंस्थेला २ कोटी ९२ लाख निव्वळ नफा

**इचलकरंजी –** येथील आर्य चाणक्य सहकारी पतसंस्थेत नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात २ कोटी ९२ लाख निव्वळ नफा झाला असून नेट एनपीए शून्य टक्के ठेवण्यात यश मिळाले आहे. बँकेची ३१ वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. त्यामध्ये वरील माहिती सांगण्यात आली.

पतसंस्थेच्या कोल्हापूरसह सातारा सांगली जिल्ह्यात शाखा कार्यरत आहेत. पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष जवाहर छाबडा यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या आजवरच्या वाटचालीची माहिती सांगितली. अध्यक्ष राजेंद्र राशिनकर यांनी अहवाल वचन केले. मुख्य कार्यकारी अधिकारी अमित पोवार यांनी नोटिस वाचन आणि विषय पत्रिका सादर केली. बँक फेडरेशनच्या उपाध्यक्ष वैशाली आवाडे यांनी मनोगत व्यक्त केले. अरविंद कुलकर्णी आणि पंडित ढवळे यांनी सूत्र संचालन केले. नरेंद्र पुरोहित यांनी आभार मानले.

## श्री साई ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचा लाभांश जाहीर

**रांजणी –** येथील श्री साई ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था सदस्यांना १५ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. संस्थेची २२ वी वार्षिक सर्व साधारणसभा नुकतीच झाली. संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग आवाड अध्यक्षस्थानी होते. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात संस्थेला ४ कोटी ०६ लाख नफा झाला असून भाग भांडवल २ कोटी इतके आहे तर राखीव निधी ३५ कोटी ९५ लाख झाला आहे. एकूण ठेवी ५६ कोटी ९९ लाख असून संस्थेला लेखा परिक्षणात अ वर्ग मिळाला आहे. गुणवान विद्यार्थ्यांना नुकतेच गौरविण्यात आले आहे. कृषीरत्न बी बी ठोंबरे यांनी मनोगत व्यक्त केले.

## प्रेरणा सहकारी बँकेचा सभासदांसाठी ११ टक्के लाभांश जाहीर

**पुणे –** पिंपरीमधील प्रेरणा सहकारी बँकेने सभासदांसाठी ११ टक्के लाभांश जाहीर केला आहे. बँक अध्यक्ष कांतीलाल गुजर यांच्या अध्यक्षतेखाली बँकेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. त्यामध्ये त्यांनी वरील माहिती सांगितली. या सभेत त्यांनी वार्षिक अहवाल सादर केला. या सभेत ज्येष्ठ ३४ सदस्यांना सन्मानित करण्यात आले तर १२५ सदस्यांना प्रेरणा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## लोकमान्य सोसायटीची ग्राहकांसाठी सिद्धिविनायक निवेश योजना

**पुणे –** येथील लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या वतीने ग्राहकांसाठी सिद्धिविनायक निवेश योजना सुरू करण्यात आली आहे. आर्थिक सुरक्षा आणि आकर्षक परतावा ही संधी ग्राहकांना मिळणार आहे. योजना गुंतवणूकदारांसाठी फायदेशीर असणार आहे. गुंतवणुकीवर १० टक्के व्याज दर मिळणार असून ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी ०.५० अधिक व्याज दर असणार आहे. एकूण १३ महिन्याचा कालावधी योजनेसाठी असणार आहे. योजनेत दहा हजार गुंतवून कोणीही सहभागी होऊ शकतो. सोसायटीच्या चार राज्यात २१३ शाखा कार्यरत आहेत, अशी माहिती सांगण्यात आली.


व्यापारी मित्र अमृतपर्व 25 K वर्गणीदार

कर व व्यापारी विषयक कायद्यातील क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत माहितीसह आर्थिक गुंतवणूक, आरोग्याविषयी माहिती देणारे व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ

स्थापना १९५०

**व्यापारी मित्र**

मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.

संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा

Payment Getway link

भारतात कुठेही निश्चित अंक मिळण्यासाठी मॅगझीन पोस्टिंगसह वर्गणीदर

| ३ वर्षांसाठी | २ वर्षांसाठी | १ वर्षांसाठी |
|---|---|---|
| २९०० | २००० | १०५० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे - ४११००४
फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290
E-mail : sampadak@vyaparimitra.com

# ‘विकसित भारत २०४७’ आणि सहकारी क्षेत्राची भूमिका

**If you want to go fast, go alone. If you want to go far, go together. - African Proverb** (सहकाराच्या तत्त्वज्ञानाचे सार)

सन २०४७ हे भारताच्या इतिहासातील टर्निंग पॉईंट ठरणार आहे – स्वातंत्र्याच्या शंभराव्या वर्षी देशाने विकसीत राष्ट्र होण्याची दिशा निश्चित केली आहे. यासाठी आर्थिक प्रगती, तंत्रज्ञान, सामाजिक समता आणि पर्यावरणपूरक विकास या सर्व अंगांना समांतर गती देणे आवश्यक आहे. या सर्वांमध्ये सहकार क्षेत्राचे योगदान हे मूलभूत व बहुआयामी ठरणार आहे.



**नवनीत भंडारी**
**९१६८६ ३५१११**

**※ सहकार : एक वैचारिक पाया –** सहकार म्हणजे केवळ आर्थिक व्यवस्था नव्हे, ती एक जीवनशैली आहे. सहकार म्हणजे लोकांनी लोकांसाठी चालवलेली लोककेंद्रित संस्था. ती नफा कमविण्यापेक्षा समाजसंघटन, समता आणि सर्वसमावेशक विकासावर भर देते.

**※ विकसित भारत २०४७ : मुख्य घटक –** पंतप्रधान नरेंद्र मोदींनी "Viksit Bharat 2047' चे जे उद्दिष्ट ठरवले आहे, त्यात हे चार आधारस्तंभ आहेत :- १. आत्मनिर्भरता, २. समृद्ध व समावेशक अर्थव्यवस्था ३. नवोन्मेष व तंत्रज्ञान आधारित विकास ४. नैतिक आणि मूल्याधारित समाज. या सर्वांमध्ये सहकारी क्षेत्राची भूमिका महत्त्वाची आहे.

**१. आर्थिक समावेशनाचा पाया –** सहकारी बँका, क्रेडिट सोसायट्या, महिला बचत गट हे भारतात बँकिंगचा ‘ग्रासरूट मॉडेल’ तयार करतात. भारतात ५ लाखांहून अधिक सहकारी संस्था कार्यरत आहेत, ज्या ३० कोटीहून अधिक लोकांना सेवा देतात.

सहकारी बँकांनी Jan Dhan Yojana, PM SVANidhi, SHG Financing यासारख्या योजनांमध्ये मोलाची भूमिका बजावली आहे.

**२. ग्रामीण व कृषी अर्थव्यवस्थेचा कणा –** सहकारी दूध संघ, साखर कारखाने, कृषी प्रक्रिया सहकारी संस्था, FPOs या संस्था केवळ उत्पादक नव्हे तर मूल्यसाखळी व्यवस्थापनातही भाग घेत आहेत. नाबार्डच्या सहकार तत्त्वावर आधारित "Producer Collectives' चा अभ्यास झाल्यावर समजते की, स्थानिक सहकार्याचा वापर केल्यास शेतीत उत्पन्न ३०% पर्यंत वाढते. ग्रामीण भागात सहकारी संस्थांमुळे स्थिर रोजगार, स्थानिक उत्पादनवाढ आणि तांत्रिक सक्षमीकरण शक्य होते.

**३. नैतिकता आणि पारदर्शकता यांचे मॉडेल –** सहकारी बँकांचे कार्य पारदर्शक असावे म्हणून सामूहिक निर्णय, वार्षिक सभासद सभा, लेखापरिक्षण यंत्रणा असते. सहकारी व्यवस्थापनाची शिकवण – विना संस्कार नाही सहकार – ही मूल्याधारित सहकाराची ओळख आहे. आजच्या स्पर्धात्मक बँकिंग व्यवस्थेत, नैतिकतेवर आधारित काम करणारे सहकारी संस्थाच विश्वासाचे प्रतीक ठरतात.

**४. नवप्रवर्तन आणि डिजिटल सहकार –** अनेक सहकारी बँकांनी Core Banking, UPI, Aadhaar Enabled Payment System स्वीकारले आहे. ग्रामीण डिजिटल बँकिंगमध्ये सहकारी बँका Last Mile Connectivity साधत आहेत. सहकार क्षेत्रातील नवउद्योजकांसाठी FinTech सहकारी प्लॅटफॉर्म्स, Agri-Tech समाधान, AI आधारित कर्ज मूल्यांकन यावर आधारित पायाभूत सुधारणा करणे आवश्यक आहे.

**※ रोजगार निर्मिती आणि स्थानिक नेतृत्व विकास –** सहकारी संस्थांमधून स्थानिक युवक उद्योजक बनत आहेत – कर्जदार ते उद्योजक हा परिवर्तनाचा प्रवास. मुलींच्या SHG, महिला सहकारी संस्था यांच्या माध्यमातून स्त्री सबलीकरणाला चालना मिळत आहे. स्थानिक नेतृत्व घडवणारी ही एकमेव बँकिंग चळवळ आहे – जे राजकीय, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात नैतिक नेतृत्व निर्माण करते.

**※ आव्हाने आणि संधी: –** आव्हान, संधी, दुहेरी नियंत्रण, सहकारी बँकिंग कायद्यात एकात्मिक सुधारणा, पारंपरिक कार्यपद्धती, डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन, NPA आणि गैरव्यवहार, मजबूत आंतरिक ऑडिट व डेटा ॲनालिटिक्स, युवा सहभागाचा अभाव, सहकारी शिक्षण, इंटर्नशिप, स्टार्टअप सहकार योजनेत सहभागी करणे.

**※ निष्कर्ष :–** सहकार क्षेत्र हे आर्थिक नसून सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे. जर भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र व्हायचे असेल, तर हा प्रवास केवळ शासकीय यंत्रणांच्या आधारे नव्हे, तर जनसहभाग, सहकार्य आणि मूल्याधिष्ठित व्यवस्थांवर आधारित असायला हवा. सहकार हा त्याचा केंद्रबिंदू आहे. विकसित भारत २०४७ हे ध्येय आर्थिक संपन्नतेसह नैतिक उन्नतीचे प्रतीक असावे लागेल. सहकार क्षेत्र हे केवळ बँकिंग पर्याय नसून – विकासाचे लोककेंद्री मॉडेल आहे. ‘सहकारातून समृद्धी’ ही घोषणा आता ‘सहकारातून विकसित भारत’ या संकल्पनेत परिवर्तित व्हायला हवी.

**– नवनीत भंडारी (प्रबंध संचालक, लातूर अर्बन को–ऑप. बँक लि. व जिल्हाध्यक्ष, सहकार भारती, लातूर)**
**– सहकारी बँकिंग आणि धोरण विषयांचे अभ्यासक व लेखक**

*****

## पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन संचालकपदी पुंगलिया

**पुणे –** महेश सहकारी बँक अध्यक्ष जुगलकिशोर पुंगलिया यांची पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या संचालक मंडळावर बिनविरोध निवड करण्यात आली आहे. ते गेली २५ वर्षांपेक्षा अधिक काळ सहकार क्षेत्रात कार्यरत आहेत.

## शरद सहकारी बँकेचा पुरस्काराने गौरव

**पुणे –** जिल्ह्यातील मंचर येथे कार्यरत असणाऱ्या शरद सहकारी बँकेला सर्वोत्तम एनपीए व्यवस्थापन पुरस्काराने नुकतेच गौरविण्यात आले आहे. बँक संचालक दत्ता थोरात, अजय घुले, मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देशमुख यांनी हा पुरस्कार स्वीकारला. डिजिटलायझेशन, कर्जवसुली यंत्रणा, पारदर्शक व्यवस्थापन या क्षेत्रात बँकेने ऊल्लेखनीय कामगिरी केली आहे.

## राजर्षि शाहू सहकारी बँकेचा सभासदांसाठी ९ टक्के लाभांश जाहीर

**पुणे –** राजर्षी शाहू सहकारी बँकेने सभासदांसाठी ९ टक्के लाभांश जाहीर केला आहे. तसेच बँकेचा एकूण व्यवसाय १६६१ कोटी इतका झाला आहे. निव्वळ नफा ६.०८ कोटी इतका झाला आहे. लेखा परीक्षणात बँकेला अ वर्ग मिळाला आहे, अशी माहिती बँकेच्या ४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सांगण्यात आली. अध्यक्षस्थानी शांताराम धनकवडे होते. अध्यक्ष धनकवडे यांनी वर्षभरातील बँकेच्या आर्थिक उलाढालीचा आढावा घेतला. ज्येष्ठ संचालक सुधाकर पन्हाळे यांनी नफा–तोटा पत्रक आणि डिजिटल उपक्रम याबाबत माहिती सांगितली. मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब डोईफोडे यांनी बदलत्या अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने, तसेच उत्पादने, सेवा आणि शेती क्षेत्रातील घडमोडीचा बँकिंग क्षेत्रावर होणारा परिणाम याबाबत विवेचन केले. अजिंक्य खोपडे आणि अभिजीत शितोळे यांनी सूत्रसंचालन तर उपाध्यक्षा कमल व्यवहारे यांनी आभार मानले.

# देशातील पहिले सहकार विद्यापीठ सहकार चळवळीसाठी दिशादर्शक

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ हा संयुक्त राष्ट्रांचा एक उपक्रम आहे. सन २०१२ च्या आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या यशानंतर संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने स्विकारलेल्या सामाजिक विकासासाठी सहकारी संस्थांवरील नवीन ठरावात सन २०२५ मध्ये दुसरे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष घोषित करण्यात केले आहे. एकत्र येऊन एक चांगले जग निर्माण करणे – हा या मागील उद्देश आहे.




सहकार क्षेत्राला प्रोत्साहन देणेसाठी आणि शाश्वत विकास उद्दिष्टांच्या अंमलबजावणीमध्ये आणि एकूण सामाजिक आणि आर्थिक विकासात त्यांच्या योगदानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाचा फायदा घेण्यास प्रोत्साहीत करतो.

**※ केंद्र सरकारचा महत्त्वपूर्ण निर्णय –**

आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाचे औचित्य साधून केंद्र सरकारने एक ऐतिहासिक महत्त्वाचे क्रांतिकारक पाऊल उचलले असून देशातील पहिल्याच त्रिभुवन सहकारी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. देशातील विविध सहकारी संस्थांमध्ये पात्र व सक्षम मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने या त्रिभुवन सहकारी विद्यापिठाची फार मोलाची मदत होणार आहे. भारत देशामध्ये सुमारे साडेआठ लाख सहकारी संस्था असून त्यामध्ये प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या एक कोटींहून अधिक लोक जोडले गेले आहेत. सहकारामुळे ग्रामीण भागातील जनजीवनाचा कायापालट झाला असून रोजगार, शिक्षण, आरोग्य, व्यवसाय इ. मध्ये मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध झाल्या आहेत. या सहकारी संस्थांमध्ये साखर कारखाने, बँका सुतगिरणी आदींचा समावेश असून विशेषतः साखर कारखान्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर सुविधा उपलब्ध करून देण्यात येऊन आर्थिक सक्षमीकरण करण्याचा प्रयत्न झालेला दिसून येत आहे. महाराष्ट्रात सहकारी क्षेत्रात साखर कारखाने उभारण्याची कल्पना सन १९१२ मध्ये मांडली. सहकारी क्षेत्रात साखर कारखाना उभारण्याचे काम सहकार तज्ञ लल्लुभाई सामळदास व सहस्त्रबुध्दे यांनी सन १९१८ मध्ये केले आहे. दि निरा व्हॅली सहकारी साखर कारखाना हा पुणे जिल्ह्यातील बारामती येथे स्थापन झाला. परंतु ऊसाअभावी तो कारखाना सन १९२४ मध्ये बंद पडला. सन १९३२ मध्ये ब्रिटिश सरकारने साखर कारखानदारीस करविषयक संरक्षण दिल्यामुळे या कायद्याचा आधार घेऊन सहकारी तत्त्वावर भारतात सन १९३३ साली चार कारखाने सुरू झाले. त्यापैकी आंध्र प्रदेशात इरिकोपड्डा येथे त्यावेळी रावबहादूर सी. एस. नरसिंहराव यांनी सहकारी तत्त्वावरील प्रति दिन ७५ मे. टन गाळप क्षमता असलेला स्थापन केलेला कारखाना आजही चालू आहे.



**साहेबराव खामकर**
**९६२५३ ४३४३४**

**※ पहिला सहकारी साखर कारखाना महाराष्ट्रात –**

स्वातंत्र्योत्तर काळात आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना लोणी, प्रवरानगर येथे सन १९५० मध्ये स्थापन करण्यात आला. भारताच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात सहकारी साखर कारखान्यांचे मोठे योगदान आहे. आज देशाच्या साखर उत्पादनात सहकारी साखर कारखान्यांचा वाटा अंदाजे ५०% च्या दरम्यान आहे. देशातील सहकारी साखर कारखान्यांची संघीय संस्था म्हणून सन १९६० मध्ये स्थापन झालेली नॅशनल फेडरेशन ऑफ को ऑपरेटीव्ह शुगर फॅक्टरीज् लि; (NFCSF) ही संस्था सहकारी साखर कारखान्यांना गाळप क्षमता विस्तार, आधुनिकीकरण, धोरणात्मक बाबी आदी विषयांवर मार्गदर्शन करीत असते. संपूर्ण भारतात सुमारे दोनशेपेक्षा जास्त सहकारी साखर कारखाने असून त्याचा थेट फायदा पन्नास लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना होत आहे. तसेच सुमारे पाच लाख लोकांना रोजगार मिळवून दिला आहे. ग्रामीण समुदयांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी सहकारी साखर क्षेत्राची महत्त्वपूर्ण भूमिका राहीली आहे. साखर उद्योग म्हणजे ग्रामीण महाराष्ट्राची लाईफ लाईन आहे. सहकार चळवळ निकोप, शुद्ध, निर्धोक व सुरक्षित राहणे गरजेचे आहे. अज्ञान आणि बेईमानी यामुळे सहकारी संस्था अडचणीत येतात. यासाठी 'विना सहकार नही उद्धार' या बरोबरच 'बिना संस्कार नही सहकार' याची जोड द्यावी लागेल.

**केंद्रीय सहकार मंत्रालयाने देशातले पहिले सहकार विद्यापीठ स्थापन करण्याचा दूरदर्शी निर्णय घेतला असून याचा सहकार चळवळीच्या विकासासाठी भविष्यात निश्चितच फायदा होणार आहे. याविषयीचे विवेचन करणारा हा लेख...**

**※ सहकारी कारखान्यांना स्पर्धा अनिवार्य –**

सहकाराला खाजगी बरोबर स्पर्धा करावी लागेल. त्याकरीता सहकाराचा अभ्यास, आर्थिक शिस्त व व्यवहार्यता असणे गरजेचे आहे. सहकारी साखर कारखाने निर्णायक टप्प्यावर उभे असतांनाच अशातच केंद्रात सहकार खात्याची निर्मिती झाली. पाठोपाठ त्रिभुवन सहकारी विद्यापीठाची स्थापना झाली. ही खरोखरीच सहकाराच्या दृष्टीने अतिशय मोलाची बाब आहे. यामुळे सहकारी चळवळीला बळकटी येईल. सहकार हा उत्सव झाला पाहिजे. भारतातील लोकांनी प्रगती



पुढील पानावर...

मागील पानावरून...

# देशातील पहिले सहकार विद्यापीठ सहकार चळवळीसाठी दिशादर्शक

करून घेण्यासाठी सहकाराची कास धरणे जरूरीचे असून ही काळाची गरज आहे. सहकारी चळवळ ज्या तत्त्वावर आधारलेली आहे, त्या तत्वांची कल्पना आल्यावर सहकारी तत्वावर कार्य करणाऱ्या व्यक्ती एकत्र येऊन कार्य करण्यास प्रारंभ केल्यानंतर त्यांचे अस्तित्त्व कायद्याने मानले पाहिजे, म्हणून महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्याची तरतूद करण्यात आली. सहकार चळवळीची वाढ वेगाने झाली. एखाद्या चळवळीची वाढ वेगाने होते, त्यावेळी त्यात चांगल्या बरोबर वाईट प्रवृत्तीही शिरतात. सहकार चळवळ वास्तविक उत्स्फूर्त चळवळ असावी. ही व्यक्तीची व त्या बरोबर समाजाची चळवळ असावी. सहकार म्हणजे ज्यामध्ये सर्वांचे सहकार्य असते त्यामध्ये गरीब श्रीमंत, लहान मोठा भेद नाही. सहकारी चळवळ ही लोकशाहीची चळवळ आहे. सर्व निर्णय चर्चेने होणे आवश्यक आहे. चर्चा म्हणजे चढाओढ नव्हे. संस्थेविषयी तळमळ, प्रामाणिकपणा हे देशहिताचे दृष्टीने आवश्यक आहे.

**✻ सहकारी संस्थांसाठी कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज –**

सर्व सहकारी संस्था सुस्थितीत चालण्याकरिता संस्थेमध्ये कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळ असणे गरजेचे आहे, कारण कालानुरूप नियम, कायदे, तंत्रज्ञान बदललेले जाते. आधुनिकीकरण होत असते. त्यादृष्टीने आवश्यक ते कुशल व पात्र मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने त्रिभुवन सहकारी विद्यापीठामध्ये शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन इ. सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तेथून शिक्षण घेऊन वेगवेगळ्या सहकारी संस्थांना प्रशासकीय, तांत्रिक, पर्यवेक्षी अशा विविध प्रकारचे मनुष्यबळाचा पुरेसा व दर्जेदार पुरवठा होईल व संस्था पूर्ण कार्यक्षमतेने चालतील व आर्थिक सक्षम होतील. विद्यापीठामध्ये संचालक मंडळासाठीदेखील प्रशिक्षणाची सोय असणे जरुरीचे आहे की, जेणेकरून संचालक मंडळ देखील सक्षमपणे कार्यरत राहील व संस्था व्यावसायिक पद्धतीने चालविल्या जाऊन उद्दिष्ट पूर्तीसाठी प्रयत्नशील राहील. देशात पहिल्यांदाच सहकार क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी सहकार विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. ग्रामीण व्यवस्थापन संस्था, आणंद (गुजरात) IRMA ला भारतातील पहिले सहकार विद्यापीठ म्हणून रुपांतरीत करण्यात आले आहे. हे विद्यापीठ पहिल्या वर्षापासून दरवर्षी आठ लाख सहकारी व्यावसायिकांना प्रशिक्षण देईल. सहकार से समृद्धी या सरकारच्या दृष्टीकोनाला समर्थन देत तांत्रिक आणि व्यवस्थापन शिक्षणावर भर देणार आहे. संशोधन, नवे उपक्रम आणि सहकार विकासाला चालना देण्यात येणार आहे. केंद्र सरकार विद्यापीठाच्या शासन व्यवस्थेवर देखरेख ठेवेल, कुलगुरू नियुक्त करील आणि उच्च शैक्षणिक दर्जा सुनिश्चित करील. जागतिक दर्जाचे शिक्षण आणि कौशल्य विकास प्रदान करून सहकार क्षेत्राला कार्पोरेट क्षेत्राशी स्पर्धात्मक बनविण्याचे उद्दिष्ट विद्यापीठाचे आहे. हे विद्यापीठ जागतिक सहकारी शिक्षणाच्या नवीन मापदंडाची स्थापना करेल आणि भारतातील सहकारी चळवळीला आणखी मजबूत करेल. त्या ठिकाणी डिग्री, डिप्लोमा आणि सर्टिफिकेट कोर्स चालविले जातील. यामधून रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील. त्रिभुवन सहकारी विद्यापीठाची स्थापना म्हणजेच खरोखरीच हे सहकाराच्या दृष्टीने मोठे क्रांतिकारक पाऊल ठरणार आहे.

'बिना संस्कार नही सहकार !
बिना सहकार नही उध्दार !!'

**– साहेबराव खामकर, साखर कारखाना प्रकोष्ठ प्रमुख,
सहकार भारती, महाराष्ट्र ✻✻✻✻✻**


## पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे

PDCC BANK

स्थापना ४ सप्टेंबर १९१७
मुख्य कार्यालय – ४ ब, बी.जे.रोड, पुणे – ४११ ००१
फोन नं. : ०२० २६३०४१०० www.pdccbank.com

**१०७ वर्षांचा गौरवशाली इतिहास असणारी देशातील अग्रगण्य जिल्हा बँक**

**✻ बँकेच्या विविध कर्ज योजना ✻**
- शेतीपूरक कारणासाठी अ. मु. कर्ज
- वाहन कर्ज
- सोनेतारण कर्ज
- शेतीकर्ज – शासकीय अनुदानित कर्ज योजना – १०.५०%
- व्यावसायिक कॅश क्रेडिट
- ग्राहक उपयोगी वस्तू कर्ज
- औद्योगिक कर्ज
- गृह कर्ज

**✻ बँकेच्या अत्याधुनिक सुविधा ✻**
- एनी ब्रँच बँकींग
- आरटीजीएस
- एनईएफटी
- मोबाईल बँकींग
- यूपीआय सुविधा
- ई-कॉमर्स
- लॉकर सुविधा उपलब्ध

✻ किफायतशीर व्याजदर ✻ जलद कर्ज पुरवठा ✻ सुलभ कर्ज प्रक्रिया

**बँकेची आर्थिक स्थिती ३१/०३/२०२५ अखेर**
- ठेवी – १४७६६.८४ कोटी
- कर्जे – १२०५९.०३ कोटी
- एकूण व्यवसाय –२६८२५.८७ कोटी

**आकर्षक व्याजदर**
दि. २३/०६/२०२५ पासून
ठेवीवरील व्याजदरात वाढ
२ वर्षांकरिता ७.००%
(ज्येष्ठ नागरिकांना अधिक १% व्याजदर)

**✻ विद्यमान संचालक मंडळ ✻**

मा.प्रा.डॉ. दिगंबर गणपत दुर्गाडे – अध्यक्ष
मा. सुनील काशिनाथ चांदेरे – उपाध्यक्ष
मा. अनिरुद्ध यशवंत देसाई – मुख्य कार्यकारी अधिकारी

अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा.


# वसंतराव चौगुले सहकारी पतसंस्था हजार कोटी व्यवसायाचे उद्दिष्ट पूर्ण करणार

**कोल्हापूर –** येथील वसंतराव चौगुले सहकारी पतसंस्था नजीकच्या काळात १००० कोटींचा व्यवसाय पूर्ण करेल, असा विश्वास पतसंस्था अध्यक्ष अनिल पाटील यांनी व्यक्त केला. पतसंस्थेच्या ३८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. संस्थेने चालू वर्षात ७५० कोटी रूपयांचा व्यवसाय केला आहे, अशी माहिती त्यांनी सांगितली.

पतसंस्थेच्या २३ शाखा कार्यरत असून ठेवी ३७५ कोटी तर कर्ज वितरण २७० कोटी करण्यात आले आहे. संस्थेने ११५ कोटीची गुंतवणूक केली असून शेअर्स भांडवल ५ कोटी आहे. राखीव निधी २१ कोटी झाला आहे, अशी माहिती अध्यक्ष पाटील यांनी सांगितली. विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सदस्यांचा सत्कार करण्यात आला. सभेला संचालक, अधिकारी, कर्मचारी, सभासद, खातेदार उपस्थित होते.

# यवतमाळ अर्बन बँकेची एकूण उलाढाल ३३३२.२० कोटी

**यवतमाळ –** यवतमाळ अर्बन बँकेने एकूण उलाढाल ३३३२.२० कोटी इतकी केली असून बँकेला अ वर्ग मिळाला आहे. बँकेच्या ठेवी १९६८.८० कोटी इतक्या असून कर्ज वितरण १३६३.४० कोटी इतके करण्यात आले आहे. बँक अध्यक्ष डॉ. नितिन खर्चे यांनी ही माहिती बँकेच्या ६० व्या सभेत सांगितली. या सभेत कार्यपत्रिकेवरील विविध विषय मंजूर करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीधर कोहरे यांनी इतिवृत्त वचन केले. संचालक वसंत सुपारे यांनी सूत्रसंचालन तर अनुप नाईक यांनी आभार मानले.

# देवगिरी नागरी सहकारी पतसंस्थेचा नवीन सदस्य करण्याचा संकल्प




**जालना** – येथील देवगिरी नागरी सहकारी पतसंस्थेच्या सर्वसाधारण सभेत सदस्यांसाठी १५ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष परेश बागवे आणि अन्य पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते. रा. स्व. संघ लवकरच १०० व्या वर्षात पदार्पण करीत असून त्यानिमित्ताने नव्याने १००० सदस्य संस्थेला जोडण्याचा निर्धार करण्यात आला. तसेच संस्थेच्या वतीने अनेकविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या सभेत गुणवंत पाल्यांचा सन्मान करण्यात आला. संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने विविध उपक्रम घेण्यात आले.

नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात संस्थेला साडे पांच कोटीचा निव्वळ नफा झाला असल्याची माहिती सभेत सांगण्यात आली. सभेत सर्व विषय मंजूर करण्यात आले. कैलास देशमुख यांनी आभार मानले.

## श्री चौंडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय नागरी सहकारी पतसंस्थेला ५ कोटी नफा

**सोलापूर** – येथील श्री चौंडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय नागरी सहकारी पतसंस्थेला नुकत्याचा संपलेल्या आर्थिक वर्षात ५ कोटी २५ लाख रूपयांचा निव्वळ नफा झाला आहे. संस्थेचे अध्यक्ष विठ्ठल बडगंची यांनी सांगितली. संस्थेने आर्थिक वर्षात १०० कोटींचा व्यवसाय पूर्ण केला आहे. संस्थेतील ठेवी २२७७६. ६६ लाख असून कर्ज वितरण १९२३२.९७ लाख इतके करण्यात आले आहे. संस्था स्थापनेपासून संस्थेला अ वर्ग मिळाला आहे. संस्थेने सभासदांना १५ टक्के लाभांश जाहीर केला आहे. संस्थेला आजवर अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे, अशी माहिती त्यांनी सांगितली.

## जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेने केला गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**यवतमाळ** – जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने गुणवान विद्यार्थ्यांचा सन्मान नुकताच करण्यात आला. अध्यक्षस्थानी उपशिक्षणाधिकारी प्रदीप गोडे होते. सहायक निबंधक अजित डेहणकर, संस्था अध्यक्ष महेश सोनेकर व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमात एकूण ६० विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

संस्था सचिव संजय बिहाडे, सूत्रसंचालन चंद्रबोधी घायवटे आणि उपाध्यक्ष संजय गावंडे यांनी आभार मानले. संस्था संचालक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# ‘डिप्लोमा इन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी कोर्सचे’ प्रमाणपत्र प्रदान




**नागपूर** – जिल्हा पतसंस्था व कर्मचारी पतसंस्था सहकारी संघ यांच्या वतीने आयोजित ‘डिप्लोमा इन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी या कोर्सचे’ समारोप आणि प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम झाला.

नागपूर जिल्हा पतसंस्था संघाचे अध्यक्ष प्राचार्य जगदीश किल्लोळ गिरनार सहकारी पतसंस्था अध्यक्ष राजेंद्र घाटे, उपाध्यक्ष अविनाश इंगोले, सहकार आघाडी महानगरचे अध्यक्ष विजय फडणवीस आघाडीचे विश्वनाथ कुंभलकर, गिरनार पतसंस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डिंपल घाटे, जिल्हा संघाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व गिरनार संस्थेचे व्यवस्थापक विलास लेंडे, गिरनार पतसंस्थेचे लेखाधिकारी अभिषेक गणवीर, पतसंस्था संघाचे व्यवस्थापक निलेश रेवस्कर तसेच स्वच्छता विभाग प्रमुख विशाल वाकडे उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त नागपूर जिल्हा पतसंस्था व कर्मचारी पतसंस्था सहकारी संघ यांच्या वतीने आयोजित डिप्लोमा इन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी झालेल्या कोर्स तर्फे ०१) वर्षा लक्ष्मीकांत फरफड, ०२) वैशाली विवेक भस्मे ०३) अनिकेत विनोद चिखले ०४) प्रशांत अशोक लांजेवार ०५) पायल पुरुषोत्तम बारापात्रे यांना प्रमाणपत्र तसेच नियुक्ती पत्रसुद्धा प्रदान करण्यात आले. गिरनार अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लिमी वतीने ०६) लक्ष्मी संजय मोहिते ०७) रिचा राकेश गटलेवार ०८) रिया राकेश गटलेवार ०९) राखी ईश्वर नरड १०) श्रुती योगेश नगरधनकर ११) अनुप प्रकाश प्रजापती यांना नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रमाला विविध पतसंस्थांचे पदाधिकारी तसेच संचालक, अधिकारी आणि गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल अनेकांनी पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

# नागरी सहकारी बँकांकडून रिझर्व बँकेच्या अपेक्षा

नागरी सहकारी बँकांचे आर्थिक क्षेत्रात असलेले महत्त्वाचे स्थान, तळागाळातील जनतेसाठी बँका करीत असलेले काम याची रिझर्व बँकेने दखल घेतली आहे. रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर स्वामीनाथन यांनी मांडलेले विचार –



डॉ. अभय मंडलिक
९४०३० ८०७२५

१) नागरी सहकारी बँका या नफा कमवण्यासाठी असलेल्या संस्था नसून, तळागाळातील व्यक्तींच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत, याची रिझर्व बँकेकडे नोंद आहे. २) नागरी सहकारी बँकांच्या या भूमिकेबद्दल त्यांनी कौतुक व्यक्त केले.

३) नागरी सहकारी बँकांनी पाच मुद्द्यांवर गंभीरपणे लक्ष द्यावे, असे त्यांनी सांगितले.

अ) प्रशासन जबाबदारी मजबूत करणे, ब) अंतर्गत हमीकाऱ्यांवर विशेष लक्ष देणे, यात ऑडिट आणि अनुपालन हे महत्त्वाचे. क) ऑडिटर्स आणि रिझर्व बँकेचे निरीक्षक यांच्याशी अर्थपूर्ण संवाद राखणे. ड) तंत्रज्ञानाचा जबाबदारीने अवलंब करणे.

इ) संस्थात्मक सामूहिक बळकटीसाठी अम्ब्रेला ऑर्गनायझेशनची मदत घेणे.

या मुद्द्यांसोबतच नागरी सहकारी बँकांच्या क्षेत्राची शाश्वत प्रगती झाली पाहिजे, यावर त्यांनी भर दिला. पुरेशी तांत्रिक तयारी नसल्यास डिजिटल बँकिंग सेवांचा आग्रह धरू नये, असेही त्यांचे मत आहे. सायबर सुरक्षा ही सर्वस्वी संचालक मंडळाची जबाबदारी आहे, त्यांनी ती काटेकोरपणे अंमलात आणली पाहिजे. ठेवीदारांचा बँकेवरील विश्वास याला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे.

संचालक मंडळाने कामकाज करत असताना व्यावसायिक पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. लेखापरीक्षण आणि अनुपालन यावर त्यांचा भर असून यासाठी संचालक मंडळात पुरेसा वेळ दिला गेला पाहिजे. या विषयातील जाणकार संचालकांनी त्यात लक्ष घालणे अपेक्षित आहे. प्रशासकीय चौकट मजबूत असली पाहिजे. यामध्ये भविष्यातील गरजांचा विचार करून मनुष्यबळ नियोजन करणे अपेक्षित आहे. लेखापरीक्षण, कर्ज विभाग, गुंतवणूक आणि सामान्य प्रशासन या विभागांमध्ये कर्मचारी अधिकारी वर्गाची दुसरी फळी तयार करणे आवश्यक आहे.

आधुनिक तंत्रज्ञान वापरत असताना पुरेशी तयारी नसल्यास, विशेषतः सुरक्षिततेबाबत पुरेशी तयारी नसल्यास, डिजिटल बँकिंग सेवांचा आग्रह धरू नये, हा रिझर्व बँकेने नागरी सहकारी बँकांना दिलेला अप्रत्यक्ष इशारा आहे. सायबर सिक्युरिटी ही संचालक मंडळाची अंतिमतः जबाबदारी आहे, यावर संचालक मंडळात पुरेशी चर्चा होणे आणि त्यानुसार अंमलबजावणी होणे हे आवश्यक आहे. संचालक मंडळाने धोरणात्मक विषयांवर अधिक काम करावे, अनुपालनावर भर द्यावा, रिझर्व बँकेच्या सूचनांचा गंभीरपणे विचार झाला पाहिजे. रिझर्व बँक काही बाबतीत मार्गदर्शक तत्त्वे आखून देते, त्या चौकटीतच काम करणे आवश्यक आहे हे होते की नाही, हे पाहण्याची संचालक मंडळावर जबाबदारी आहे.

रिझर्व बँक ज्यावेळी अपेक्षा व्यक्त करते, त्याचवेळी हे न झाल्यास दंडात्मक कारवाई होऊ शकते, असा अप्रत्यक्ष इशारा यातून स्पष्ट होतो आणि तसे अनुभवही आहेत. रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या डेप्युटी गव्हर्नर यांनी दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे संचालक मंडळाचे कामकाज होते आहे की नाही हे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्यासोबत तज्ञ संचालकांनी पाहणे गरजेचे आहे. बोर्ड मॅनेजमेंटने यावर गंभीरपणे लक्ष देण्याची गरज आहे.

**डॉ. अभय मंडलिक.**

**लेखक बँकिंग विषयाचे अभ्यासक असून खामगाव अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक आहेत.**

****






## साखर कारखाना प्रकोष्ट जिल्हा प्रमुखपदी भाऊसाहेब आव्हाळे

**पुणे** – सहकार भारती साखर कारखाना प्रकोष्ट जिल्हा प्रमुखपदी अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर येथील भाऊसाहेब आव्हाळे यांची निवड करण्यात आली आहे. ते सध्या कृषिनाथ ग्रीन एनर्जी साखर कारखान्यांचे संचालक म्हणून कार्यरत आहेत. आळंदी येथे झालेल्या सहकार भारतीच्या दोन दिवसीय अभ्यासवर्गात पुणे विभाग प्रमुख गिरीश भवाळकर यांनी ही निवड जाहीर केली.

या निवडीबद्दल सहकार भारतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि साखर उद्योग क्षेत्रातील कार्यकर्ते यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## दि मुस्लिम को–ऑप. बँक अध्यक्षपदी पी. ए. इनामदार

**पुणे** – येथील दि मुस्लिम को–ऑप. बँक अध्यक्षपदी पी. ए. इनामदार आणि उपाध्यक्ष पदी अय्युब शेख यांची नुकतीच निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपनिबंधक दिगंबर हौसारा यांनी काम पाहिले. वरील दोनही पदे रिक्त असल्याने नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.




# जनता अर्बन को-ऑप. बँकेची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**वाई –** येथील जनता अर्बन को-ऑप. बँकेची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच पार पडली. सभेत सन २४ – २५ वर्षाचा ताळेबंद, नफा तोटा पत्रक आणि अन्य विषयांना एकमताने मंजुरी देण्यात आली. बँकेचे संस्थापक संचालक सुरेश कोरडे, अध्यक्ष बळीराम जगताप होते. अध्यक्ष जगताप यांनी वर्षातील बँकेच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेतला.

बँकेने आर्थिक वर्षात ब वर्ग संपादन केला असून निव्वळ एनपीएचे प्रमाण २.३० टक्के राखण्यात यश मिळविले आहे. रोजच्या कामकाजात बँकेच्या वतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात येत आहे. तसेच ग्राहकांना सर्व योजना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, असे अध्यक्ष जगताप यांनी संगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी रूपाली बुलुंगे यांनी विषय पत्रिकेचे वाचन केले. बँकेच्या सभासदांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना अध्यक्ष जगताप यांनी उत्तरे दिली. प्रशासन अधिकारी विक्रम कोरडे यांनी सूत्रसंचालन केले.

# रोजगार निर्मितीला चालना मिळावी यासाठी सहकार खात्याचा पुढाकार

**पुणे –** ग्रामीण भागातील अर्थकारण आणखी विकसित व्हावे तसेच रोजगार निर्मितीला चालना मिळावी, यासाठी सहकार खात्याने पुढाकार घेतला आहे, असे सहकार भारतीचे पुणे जिल्हा अध्यक्ष विनायक तांबे यांनी सांगितले.

सहकार भारती पुणे विभाग आणि सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. औद्योगिक वसाहत फेडरेशन अध्यक्ष अमित बेनके व्यासपीठावर होते.

ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी तसेच व्यवसाय प्रशिक्षण, शासन योजना पतसंस्था आणि सहकार चळवळीच्या संयुक्त प्रयत्नांतून उद्योग व्यवसाय यांचे जाळे उभे करण्यात येणार आहे, असे तांबे यांनी सांगितले. सहायक निबंधक विठ्ठल सूर्यवंशी यांनी मनोगत व्यक्त केले. सहकार भारती पुणे विभाग प्रमुख गिरीश भवाळकर यांनी प्रास्ताविक केले.


## सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या; कराड
## (शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

***नागरी सहकारी बँकांसाठी***

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. व्यंकटेश कुलकर्णी (प्रशिक्षण प्रमुख) – ९४०३० ८०७५१**

**श्री. माधवेंद्र कोरडे – (फक्त मेसेजसाठी) ९८५०५ ७१४०५**

*** प्रशिक्षण कार्यालय –** फ्लॅट नं. ३, रामेश्वर अपार्टमेंट, साई सर्व्हिस पेट्रोल पंपामागे, पूलाची वाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४ ई–मेल : sahakarbharati1416@gmail.com



दि यवतमाळ अर्बन
को-ऑप. बँक लि., यवतमाळ
मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ 445001
फोन : 07232-244241, 243703, 237442
Regd.No.YML/BNK/114
आम्ही जपतो
वारसा विश्वासाचा
ई-वाहन
कर्ज सुविधासह
समृध्दी
चार चाकी व तीन चाकी
वाहन कर्ज योजना
योजनेचा व्याजदर 9.50%
योजना कालावधी : ०१ ऑगस्ट ते ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत
अधिक माहितीकरीता शाखा व्यवस्थापकाशी संपर्क साधावा.
| डॉ. नितीन खर्चे अध्यक्ष | अजिंदरसिंह चावला उपाध्यक्ष | श्रीधर कोहरे मुख्य कार्यकारी अधिकारी
संचालक - श्री. अजय विठ्ठलदासजी मुंधडा, श्री.आशिष हरिहरराव उत्तरवार, श्री.प्रशांत अरुण मामनवोट्टीवार, श्री.संजय चिंतामणराव डेहणकर,
श्री.प्रमोद मधूकरराव दुर्वे, ॲड.श्री.प्रफुल्लसिंह लक्ष्मणसिंह चौहान, श्री.गोवर्धन दयाराम राठोड, श्री.परिमल प्रेमकुमार देशपांडे, डॉ.श्री.महेश दामोदर तारोळकर,
श्री.वसंता रामजी सुपारे, श्री.संतोष विष्णूकांत पेन्शनवार, श्रीमती मिरा राजेश घाटे, सौ.शिला राजेश्वर निवल, श्री.नरेंद्र देवराव देशपांडे (तज्ञ संचालक),
श्री.संतोष विठ्ठलराव कुचनकर (तज्ञ संचालक)

## सहकार चळवळीतील महनीय व्यक्तींचा जीवनप्रवास
## महाराष्ट्रातील १७५ कार्यकर्तृत्वांचा सचित्र आलेख

**द्वितीय आवृत्तीचे प्रकाशन दि. २१ सप्टेंबर २०२४, शिर्डी**



**सहकार भारती प्रकाशित**
**सहकार सुगंध निर्मित...**

# सहकार महर्षी




**सहकार चळवळीतील प्रत्येकाने**
**आवर्जून वाचावा असा ग्रंथ**

**सहकार महर्षी ग्रंथ – प्रतींनुसार विशेष किंमत (कुरिअर मोफत)**

| | | |
|---|---|---|
| १ ते ५ ग्रंथ घेतल्यास | – | रु. १५००/– प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ६ ते १० ग्रंथ घेतल्यास | – | रु. १३५०/– प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ११ व त्यापेक्षा अधिक घेतल्यास | – | रु. १२००/– प्रमाणे प्रती ग्रंथ |

- महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी शिफारस केलेला ग्रंथ

A/c Name :
Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.
Bank Name :
State Bank of India
Branch :
Hingne Khurd, Pune Branch
Current a/c No. : 36931889346
IFS Code : SBIN0007159

UPI ID SahakarSugandha@SBI
सोबत दिलेला QR कोड स्कॅन करून
ऑनलाईन पेमेंट करावे व तसे कार्यालयास कळवावे.

**बुके नको 'बुक' देऊ या! आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला 'सहकार महर्षी' ग्रंथ देऊ या!**

**सहकार सुगंध मासिकात माहिती देणे, वर्गणी भरणे तसेच जाहिरातींसाठी जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा ही विनंती - संपादक**

**श्री. संतोष गावंडे :** रिजनल हेड (विदर्भ) 9420116337

**श्री. विनायक भिसे :** रिजनल हेड (पश्चिम महाराष्ट्र व कोकण) 9923396312

| पश्चिम महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| रहाटणी, पुणे | श्री. डी. एस. कुलकर्णी | 9420655316 |
| पिंपरी चिंचवड | श्री. शिरीष लिपारे | 9762830555 |
| इचलकरंजी | श्री. प्रशांत कुलकर्णी | 9421172965 |
| सोलापूर जिल्हा | श्री. चंद्रकांत धोंडे | 9881139150 |
| संगमनेर | श्री. विजय भिडे | 9975516360 |
| बेलापूर, जि. नगर | श्री. अरविंद शहाणे | 9922707677 |
| सातारा | श्री. विनायक भिसे | 9923396312 |
| **कोकण विभाग** | | |
| मुंबई-अंधेरी | श्री. रामकृष्ण आवारे | 9619318544 |
| मुंबई-विक्रोळी | श्री. प्रभाकर कांबळे | 9594293734 |
| मुंबई-जोगेश्वरी | श्री. गणेश खिलारे | 9322161526 |
| मुंबई-बोरिवली | श्री. केशव खाडे | 9969825835 |
| डोंबिवली | श्री. संदीप गव्हाणे | 7738449033 |
| पालघर | श्री. सदानंद पावगी | 8888880680 |
| मुरूड, जंजिरा | श्री. मेघराज जाधव | 9561710445<br>9421164777 |
| मुंबई-सायन | श्री. भरत चिंचोले | 7021862169 |

| उत्तर महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| जळगाव | श्री. विश्वास कुलकर्णी | 9922653022 |
| पिंपळनेर, धुळे | श्री. सुर्यकांत जगताप | 9552570515 |
| नंदूरबार | श्री. महादू हिरणवाळे | 9823842991<br>8208147121 |
| नाशिक | श्री. राजीव चंद्रात्रे | 9403261226 |
| नाशिक | श्री. नितीन बीबीकर | 9665778497 |
| **मराठवाडा विभाग** | | |
| छत्रपती संभाजीनगर | श्री. योगेश भोसले | 9421704116 |
| पैठण | श्री. देवेश इनामदार | 9404981212 |
| लातूर | श्री. शरद दिवे | 8275020460 |
| परभणी | श्री. संतोष पाथरीकर | 9763012439 |
| परभणी | श्री. मंगेश पाठक | 8149355759 |
| जालना | ॲड. दशरथ इंगळे | 9422723784 |
| **विदर्भ विभाग** | | |
| नागपूर | श्री. महेश राव | 9545741474 |
| यवतमाळ | श्री. संतोष गावंडे | 9420116337 |
| भंडारा | श्री. मुकुंदा पांढरीपांडे | 9420514872 |

## सहकारी संस्थांना अत्यंत उपयुक्त खालील पुस्तके सहकार सुगंध कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १ | सहकार महर्षी ग्रंथ | १५००/- |
| २ | सहकार बँकांचे कर्ज व्यवस्थापन | ३५०/- |
| ३ | नागरी सहकारी बँकेचे प्रशिक्षण | १२५/- |

**पुस्तकांसाठी संपर्क : ८८०५९ ८१६७३**

वरील पुस्तकांसाठी रक्कम तसेच सहकार सुगंधची वर्गणी भरण्यासाठी सहकार सुगंधच्या वरील जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा किंवा खालील बँक खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खालील क्यूआर कोड वापरावा.

सहकार सुगंधची वर्गणी १ जानेवारी २०२५ पासून-
**वार्षिक रु. ७००/- त्रैवार्षिक रु. १८००/-**

**UPI ID**
**SahakarSugandha@DNSbank**

**A/c Name : Sahakar Sugandha**
**Bank Name : Dombivali Nagari Sahakari Bank Ltd.**
(Sihagad Road, Pune Branch)
**Current a/c No. : 078011100000065**
**IFS Code - DNSB0000078**

**UPI ID**
**SahakarSugandha@SBI**

**A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

**कृपया वर्गणी जमा केल्यानंतर आपला नाव व पत्ता पुढील ई मेलवर कळवा. sahakar.sugandha@gmail.com**

**महाराष्ट्रात जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क : ८८०५९८१६७३**


AURO®
SINCE 1948
ISO CERTIFIED ISO 9001 : 2008
BIS Certified
IS : 550 CM/L.No.7200069405
IS : 550 CM/L.No.3740863
IS : 550 CM/L.No.2863066
IS : 550 BIS Certified
SALES & SERVICES
ALL MAHARASHTRA REGION
CASH SAFE I GOLD SAFE I VAULT I LOCKER CABINET
JEWELLER'S SAFE I PETROL PUMP SAFE
Our trusted partners for 75 years
Contact : Mrs. Suvarna Kshirsagar
Office Address : 1453, Shop No. 06, Shiv Parvati Society, Behind Janata
Sahakari Bank. Khadilkar Path, Bajirao Road, Shukrawar Peth, Pune -411002
mtc1506pune@yahoo.com www.aurombica.com
7559283467 I 9685061515 I 9879791521

नवरात्री उत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा!

सांगली अर्बन बँकेच्या विविध कर्ज योजना


कार लोन


होम लोन


गोल्ड लोन


एमएसएमई लोन


एज्युकेशन लोन


रूफटॉप सोलरसाठी लोन

* व्याजदर - नियम व अटी लागू.

अधिक माहितीसाठी आमच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.

मोबाईल : ७८८८००९७१८

Since 1935

SUB का साथ, आपका विकास

सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली

(शेड्युल्ड को-ऑप. बँक)


प्रधान कार्यालय : ४०४, खणभाग, सांगली ४१६४१६, फोन : (०२३३) १३७६२३६ /३७/३८

सहकार भारतीचे मुखपत्र सहकार सुगंध निर्मित

नागरी सहकारी 2026
बँक / पतसंस्था दैनंदिनी

नागरी सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेच्या सर्व परिपत्रकांचा मराठीत संक्षिप्त गोषवारा तसेच QR कोडच्या मदतीने RBI ची सर्व मूळ परिपत्रके उपलब्ध असणारी एकमेव दैनंदिनी व नागरी सहकारी पतसंस्थेच्या दैनंदिनीमध्ये गेल्या तीन वर्षातील सर्व महत्वाच्या परिपत्रकांचा समावेश

देशभरातील नागरी सहकारी बँका व पतसंस्थांच्या संख्येनुसार आर्थिक स्थितीच्या उपयुक्त माहितीसह...




नागरी सहकारी बँक दैनंदिनी २०२६

किंमत रु. 500/-

अधिक प्रतींसाठी विशेष सवलत

आजच नोंदणी करा!

किंमत रु. 400/-

अधिक प्रतींसाठी विशेष सवलत

आजच नोंदणी करा!

नागरी सहकारी पतसंस्था दैनंदिनी २०२६




सहकार भारतीचे मुखपत्र 'सहकार सुगंध' कार्यालय : ऑफिस नं. १५, विष्णुप्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे - ४११०३० मो. : 8805981673 ईमेल : sahakar.sugandha@gmail.com


टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
तुमच्या सोसायटीच्या व्यवहारांसाठी एक स्मार्ट मोबाईल ॲप
ऑनलाइन मेंटेनन्स पेमेंटपासून ते तक्रारींच्या व्यवस्थापनापर्यंत – तुमच्या सोसायटीसाठी एकच ॲप!
TJSBSociety
www.tjsb.bank.in | ✆ : 022-48897210


safe age
Security Products Pvt. Ltd.
OM SALES CORPORATION
All our Products are BIS Standards
Our Certificates
ISO 14001 : 2004
IS 5244 : 2014
CM/L-7500087614
IS 550 : 2014
CM/L-3978088
IS 11188 : 2014
CM/L-2870669
ISO 9001 : 2008
Electronic safe
Depository safe
Gold Safe
Fire Resistant Cabinet
Fire Resistant Filing Cabinet
Industrial Locker
Compactor
Nilesh Bonde Mob.: 9850120090 / 8698337947
Website : www.omsalescorportion.net I Id : omsales.safeage@gmail.com
Add. : S.No. 179, Fuge Vasti, Behind Pyramid Hotel,
Near Gajanan Maharaj Mandir, Magzine Chowk,
Bhosari-Alandi Road, Bhosari - 411039.
Factory Add - Safeage Security Products Pvt. Ltd., Shiye, Jyotiba Road, Kolhapur
We are authorised distributor for Pune, Satara, Sangli, Solapur, Ratnagiri,
Sindhudurg, Raigad, Ahemadnagar, Nashik, Jalgaon, Dhule, Nandurbar,
Aurangabad, Jalna, Parbhani, Hingoli, Usmanabad, Beed, Latur, Nanded,
Buldhana, Akola, Amravati, Yavatmal, Washim, Nagpur, Bhandara,
Wardha, Chandrapur, Gadchiroli, Gondiya,


श्रद्धेने प्रेरित
समृद्धीसाठी साकारलेले
स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
सिद्धी विनायक निवेश
एक उत्सवी मुदत ठेव योजना
10%*
व्याजदर प्रतिवर्ष
कालावधी 13 महिने
किमान गुंतवणूक रु.10,000/-
ज्येष्ठ नागरिकांसाठी 0.50% अधिक व्याजदर
*फक्त सभासदांकरिता *नियम व अटी लागू
स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
महाराष्ट्र • कर्नाटक • गोवा • दिल्ली
Reg. No. M.S.C.S./C.R./140/2002
संस्थापक - अध्यक्ष : डॉ. किरण ठाकुर, सल्लागार संपादक, तरुण भारत, बेळगाव.
Call 1800 212 4050 | lokmanyasociety.org

Registered - SAHAKAR SUGANDHA - PRGI NO. MAHMUL/2005/16099
Magazine Post Contract No. : BP/EP 40280299 Customer ID : 3000071496
(Publication Date - 05/09/2025) Posting on 07/09/2025 Posting at BMI Pune PSO, Pune 411001




**प्रेषक :**

**सहकार सुगंध कार्यालय**

ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट,
५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा,
सिंहगड रोड, पुणे - ४११०३०.
मो. : ८८०५९८१६७३

**प्रति,**